पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १७१ ■ रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६
RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com







# नगरसेवकांची ठेकेदारी-कमिशनखोरी; शहराची राखरांगोळी

## आरआरसी नेटवर्कच्या 'झी महासेल' महाचर्चेत सत्ताधाऱ्यांवर थेट आरोप

**अकोला :** शहराचा विकास करण्यासाठी निवडून आलेले काही नगरसेवकच ठेकेदार बनून कमिशनखोरीत मग्न झाले असतील, तर शहराचा विकास होणार कसा ? असा थेट आणि आक्रमक सवाल व्यक्त्यांनी आरआरसी नेटवर्कच्या झी महासेल प्रस्तुत 'महाचर्चा' कार्यक्रमात केला. शनिवारी रात्री जिजाऊ नगर येथील ग्रीनफिल्ड ३६० क्रिकेट टर्फवर झालेल्या या चर्चेने राजकीय वर्तुळात खळबळ उडवली. लवकर या कार्यक्रमाचे प्रसारण आर आर सी न्यूजवर करण्यात येईल. आरआरसीचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली या महाचर्चेचे आयोजन करण्यात आले होते.

निमंत्रित ज्येष्ठ पत्रकार व संपादक सचिन देशपांडे यांनी केलेल्या भारदस्त आणि आक्रमक सुत्रसंचालनाने कार्यक्रम यशस्वी झाला. सजग नागरिकांनी विचारलेल्या, जिव्हारी लागणाऱ्या प्रश्नांनी संपूर्ण कार्यक्रम तापला. 'चोर-चोर मौसेरे भाई' या एका प्रश्नकर्त्याच्या बोचऱ्या टिकेने तर चांगलाच वाद पेटला. यावेळी आमदार साजीदखान पठाण संतप्त झाल्याचे चित्र दिसले. त्याच बरोबर बंद पडलेल्या महापालिका शाळांवर आपने उपस्थित केलेला प्रश्नावर अनेकांची बोलती बंद झाली होती. टॉवर चौकातील प्राईम लोकेशनला जो टॅक्स द्यावा लागतो तो हद्दवाढीच्या शिवनीतील गरिबाला द्यावा लागतो असा महत्वपुर्ण मुद्दा जयप्रकाश मुरूमकार यावेळी उपस्थित केला गेला. त्यावर तोडगा काढण्याची गरज व्यक्त केल्या गेली. आर आर सी ने कार्यक्रमासाठी भाजप नेते विजय अग्रवाल, शहर अध्यक्ष जयंत मसने यांना बोलविले होते. पण, महायुतीच्या चर्चेत ते असल्या कारणाने ते विकसित अकोल्यासाठीच्या महाचर्चा या कार्यक्रमात उपस्थित राहिले नाही.




### भूमिगत योजना बाळासाहेबांनी आणली - निलेश देव

"भूमिगत गटार योजना बाळासाहेब आंबेडकर यांनीच सुरू केली होती आणि तेव्हाच ती पूर्ण व्हायला हवी होती, असे निलेश देव यांनी सांगितले. न्यू तापडिया नगर उड्डाणपुलासाठी ५४ कोटींचा निधी येणे बाकी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वंचितच्या पुढाकारामुळे जिजाऊ सभागृहाचा कायापालट झाल्याचा दावाही त्यांनी केला. वंचित सत्तेत आल्यास टॅक्स कमी करु, कचरा घंटागाडीचे पैसे देण्याची गरज भासणार नाही. जनतेकडून टॅक्स घेत असताना घंटागाडीचे पैसे वंचित च्या सत्ता काळात द्यावे लागणार नाही. रस्ते प्रकाशमान होतील असे स्ट्रिट लाईट लावू, दररोज पाणी देण्याचा संकल्प वंचितचा असल्याचा दावा देव यांनी केला."

### आमच्यासाठी सर्व पर्याय खुले - योगेश अग्रवाल

"भाजप शिंदे गटाला फक्त १० जागा देण्याच्या चर्चेवर संतप्त प्रतिक्रिया देताना योगेश अग्रवाल म्हणाले, 'आमच्यासाठी सर्व पर्याय खुले आहेत. जो अधिक प्रतिनिधित्व देईल, त्याच्यासोबत जाऊ.' शिवसेनेच्या पाठीशी रहा, विकास करून दाखवू, असा शब्द त्यांनी दिला. नगर विकास खाते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. त्याच्यामाध्यमातून शहराचा कायापालट आम्ही करु असा विश्वास योगेश अग्रवाल यांनी व्यक्त केला. महाचर्चा या कार्यक्रमात योगेश अग्रवाल यांचा नेमका कोणासोबत वाद झाला यासाठी संपुर्ण महार्चा कार्यक्रम आर आर सी च्या यु ट्युब व सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर पाहता येतील."



### काँग्रेसच्या हाती सत्ता द्या - आ. साजीदखान पठाण

"महापालिकेची सत्ता काँग्रेसकडे आली, तर नागरिकांवर लादलेली करवाढ कमी करू, शहरात दर्जेदार रस्ते, उद्याने, मनपा शाळा आणि सौंदर्यीकरणावर भर देऊ, अशी ठाम ग्वाही आमदार पठाण यांनी दिली. भूमिगत गटार योजना बंद पाडण्याचा इशारा देत डाबकी रोडवरील कामात इतके कमिशन घेतले की ठेकेदारच काम पुढे नेत नाहीत, असा गंभीर आरोप त्यांनी केला. मनपा अधिकारी सत्ताधाऱ्यांचे हस्तक बनल्याची टीकाही त्यांनी केली. महापालिकेतील भाजपाचे ठेकेदार कोण यावर मात्र साजीद खान यांनी काय उत्तर दिले यासाठी हा संपुर्ण कार्यक्रम दर्शकांना पाहावा लागेल. त्याच बरोबर काँग्रेसच्या नगरसेवकांनी मनपात ठेकेदारी केली तर काय करणार यावर साजीद खान यांनी महत्वपुर्ण विधान केले.

भाजपा ने कार्यकाळात शहराची संपूर्ण वाट लावून टाकली आहे. भरमसाठ गब्बर टॅक्स वाढवून नागरिकांचे कंबरडे मोडून टाकले आहे. एवढा टॅक्स भरल्यानंतरही नागरिकांना सुविधेच्या नावावर काय मिळते याचा नागरिकांनी विचार करावा. शहरात सुंदर रोड नाहीत बगीचे नाहीत, शहराच्या समस्यांबाबत मी अनेकदा विधानसभेत आवाज उठवला आहे.
मी सत्तेत नाही त्यामुळे विधानसभेत माझ्यासोबत काय बदला घेतला जात आहे हे मलाच माहित आहे. ज्याप्रमाणे माझ्यासारख्या साधारण व्यक्तीला नागरिकांनी आमदार बनवले तसा माझ्यावर विश्वास ठेवला तसाच यंदा काँग्रेसवर विश्वास ठेवा. मी शब्द देतो संपूर्ण शहराचा चेहरा मोहरा बदलून ठेवेल. विनयकुमार पाराशर सारखा विकास करून दाखवू आज भारतीय जनता पार्टीचे लोक इथे आले नाहीत देव करो महापालिकेत सुद्धा त्यांचे लोक निवडून येता कामा नये.
यंदा काँग्रेस तर्फे योग्य उमेदवार देण्याचा आमचा प्रयत्न राहील उमेदवाराला मी ठेकेदारी करणार नाही असे शपथ पत्र द्यावे लागेल.
भारतीय जनता पार्टीचे सगळेच नगरसेवक ठेकेदार बनले आहेत. काँग्रेसचा एकही नगरसेवक ठेकेदार बनणार नाही अशी मी ग्वाही देतो. मी बिहारमध्ये जिथे प्रचार केला तिथे काँग्रेसचा उमेदवार निवडून आणला. भारतीय जनता पार्टी नागरिकांना रोजगार देऊ शकत नाही. त्यांच्या काळात विकासाची एवढी चर्चा झाली की विकासच पागल झाला आहे. शहरातील उडान पूल आणि अंडरपास हे भाजपाचे अपयश आहे.
काँग्रेस यंदा सत्तेत आल्यास सर्वप्रथम हा गब्बर टॅक्स आम्ही रद्द करू. मला आमदार व्हायला केवळ एक वर्ष झाले महापालिकेत काँग्रेसची सत्ता येऊ द्या संपूर्ण महानगराचा चेहरा बदलून टाकू. यंदा काँग्रेसचे २५ नगरसेवक निवडून येतील असा विश्वास आमदार साजिद खान पठाण यांनी व्यक्त केला. शेवटी त्यांनी म्हटले की अभी तो जीत बाकी है अभी तो हार बाकी है,, अभी तो पहिला पन्ना खोला है आखरी पन्ना बाकी है या शब्दात त्यांनी महाचर्चाची सांगता केली.




### अकोलेकरांचा उत्साही सहभाग

अकोल्याच्या विकासासाठी आयोजित या महाचर्चा या कार्यक्रमात आशीष पवित्रकार, ठाकूरदास चौधरी, सुनील इन्नानी, पंकज कोठारी, सौरभ भगत, प्रदीप गुरूखुद्दे, प्रदीप वखारिया, मनीष मिश्रा, पराग कांबळे, सरिता वाकोडे, डॉ. संदीप चव्हाण, कपिल रावदेव, अतुल आलेगावकर, पत्रकार दिनेश शुल्का, योगेश फरपट आदी मान्यवर सहभागी झाले होते. महाचर्चेने अकोल्याच्या राजकारणातील अंतर्गत संघर्ष, आरोप-प्रत्यारोप आणि आगामी निवडणुकीतील रणधुमाळीचा स्पष्ट इशारा दिला आहे.

### व्यासपीठावर राजकीय वजनदार चेहरे

या कार्यक्रमाला काँग्रेस नेते व आमदार साजीदखान पठाण, वंचित शहर अध्यक्ष निलेश देव, शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख मंगेश काळे, माजी उपमहापौर रफिक सिद्दिकी, माजी नगराध्यक्ष हरीशभाई आलिमचंदानी, काँग्रेस महानगराध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे, मनसे जिल्हाप्रमुख पंकज साबळे, शिवसेना (शिंदे गट) उपजिल्हाप्रमुख योगेश अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

माजी नगरसेवक आशीष पवित्रकार, ठाकूरदास चौधरी, बिल्डर सुनील इन्नानी, पंकज कोठारी, मनसेचे सौरभ भगत, दखल संस्थेचे प्रदीप गुरूखुद्दे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रदीप वखारिया, मनीष मिश्रा, नकीर खान, पराग कांबळे, शिवसेनेच्या महिला संघटिका सरिता वाकोडे, डॉ. संदीप चव्हाण, कपिल रावदेव, अतुल आलेगावकर, पत्रकार योगेश फरपट, डॉ. प्रशांत, अविनाश अंजनकर, श्रीकृष्ण राजाने, राजेश डोंगरकर महाराष्ट्र अध्यक्ष अँटीकरप्शन, अविनाश गोसावी, गोपाल नागपुरे, आपचे प्रदीप कुमार, उद्योजिका काजल राजवैद्य, रवी शिंदे, मो. इरफान, मोईन खान, जगदीश मुरूमकार आदी चर्चेत सहभागी झाले होते.




### तर अकोल्यात मोठी गुंतवणूक.....

खूप चांगला उपक्रम आहे यामधून सामान्य जनतेपर्यंत समस्या पोहोचल्या, जे लोक निवडणूक मध्ये फिरणार आहेत जे निवडून येणार आहेत त्यांनी विकासासाठी प्रॉपर प्लॅनिंग करून आपले काम करावे, बांधकाम व्यवसाय मधील लोकांना टॅक्स कमी करावे, बाहेरील इन्व्हेस्टर या शहरात यायला पाहिजे, टॅक्स कमी असल्यास या ठिकाणी बाहेरचे इन्वेस्टर अकोला शहरात येऊ शकतात असे मत अकोल्यातील प्रतिथयश बिल्डर पंकज कोठारी म्हणाले.



### हद्दवाढीच्या भागात सुविधांची गरज

"अकोला शहरातील हद्द वाढ झाल्यामुळे अकोला शहराची वाढ ही बावीस किलोमीटर पर्यंत झालेली आहे, विकल्प नदी मधील रेड लाईन तसेच ब्लू लाईन ही अत्यंत अन्यायकारक आहे, गरीब लोकांना खरं पाहिजे असतील तर हद्द वाढ मधील समस्या निकाली लावणे अत्यंत गरजेचे आहे. शहराची हद्द वाढ झाली आहे परंतु जोपर्यंत इंफ्रास्ट्रक्चर तयार होत नाही तोपर्यंत आपण शहराच्या विकासाची कल्पना करू शकत नाही शहरात बेरोजगारीचा मोठा प्रश्न आहे परंतु पीएम आवास योजना आणखी ताकदीने राबवली गेल्यास अनेकांना रोजगार मिळू शकतो लोकांना स्वस्तात घरे कशी मिळतील यासाठी आमचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती बिल्डर सुनील इन्नानी यांनी व्यक्त केली. हद्दवाढीच्या भागात मुलभूत सोयी सुविधांचा अभाव आहे. शहर सिटी बस लवकर सुरु झाल्यास शहराचा विस्तार होईल."

### भाजपच्या तिकिटावर निवडणूक - हरीश आलिमचंदानी

"महाचर्चेतील सर्वात मोठी 'ब्रेकिंग न्यूज' ठरली ती माजी नगराध्यक्ष हरीश आलिमचंदानी यांच्या घोषणेने. तिसऱ्या आघाडीची शक्यता संपुष्टात आली असून आपण भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. योग्य उमेदवार मिळाले, तर भ्रष्टाचार आटोक्यात येईल, असा दावा त्यांनी केला. भाजप बद्दल सकारात्मक असलेल्या हरीश आलिमचंदानी यांनी नेमके काय म्हटले यासाठी महाचर्चा या संपुर्ण कार्यक्रम दर्शकांना लवकरच आर आर सीच्या यु ट्युब आणि सोशल मिडिया प्लॅटफार्मवर पाहता येईल."

### सत्ताधाऱ्यांमुळेच विकास रखडला - रफिक सिद्दिकी

"१७ वर्षांपासून भूमिगत योजना रखडली आहे, मनपा शाळा बंद पडत आहेत, शहरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट आहे. शहराची बकाल अवस्था सत्ताधाऱ्यांची देण आहे, असा घणाघाती आरोप शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी उपमहापौर रफिक सिद्दिकी यांनी केला. शहरातील स्वच्छतेची समस्या बिकट असून डंपिंग ग्राऊंड शहराचे आरोग्य बिघडवत असल्याचे ते म्हणाले."

### श्वान नसबंदीतही घोटाळा - पंकज साबळे

"शहरात कुत्र्यांची समस्या गंभीर आहे. नसबंदीवर लाखो रुपये खर्च झाले तरी परिस्थिती जैसे थे आहे. यातही पैसे खाल्ले गेले, असा थेट आरोप पंकज साबळे यांनी केला. पण, हे पैसे कोणी खाल्ले याचा खुलासा त्यांनी केला नाही. पण नेमका काय आरोप साबळे यांनी भाजपवर केले त्याच बरोबर मनसे किती जागा जिंकतील याचा केलेल्या दाव्यासाठी आर आर सी चा कार्यक्रम पहावा लागणार आहे."

### करवाढ विरोधात काँग्रेसचा संघर्ष - डॉ. प्रशांत वानखडे

"मालमत्ता कर वाढीविरोधात काँग्रेसने थेट उच्च न्यायालयात दाद मागितली आहे. जनतेवर भुर्दंड नको, हीच आमची भूमिका आहे, असे काँग्रेस शहर अध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे म्हणाले. मनपात काँग्रेसची सत्ता आली तर चुकीच्या गोष्टींना आळा घालू, तसेच २५ ते ३० जागा मिळण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली."

CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५
http://epaper.citynewssuperfast.com

## श्री. संत गजानन महाराज विजय ग्रंथ सामुहिक पारायण सोहळ्याचे भव्य व भक्तिमय आयोजन

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**अमरावती :** पौष महिन्याच्या पावन पर्वाचे औचित्य साधून एकता गजानन महाराज पारायण सोहळा समिती यांच्या वतीने श्री. संत गजानन महाराज विजय ग्रंथ सामूहिक पारायण सोहळ्याचे भव्य व भक्तिमय आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा रविवार, दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी अमरावती शहरातील श्री. संत लहानुजी महाराज मंदिराजवळ, छांगानी नगर येथे मोठ्या श्रद्धा व भक्तिभावाने संपन्न होणार आहे. या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे पुणे येथील श्री. गजानन महाराजांच्या अलौकिक कृपाप्रसादाने अवघ्या १० वर्षीय कु. सुरभी ढगे हिच्या मुखातून होणारे श्री. गजानन महाराज विजय ग्रंथाचे पवित्र वाचन. अल्पवयातही अध्यात्मिक परंपरेचे जतन करणाऱ्या कु. सुरभीच्या वाचनामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

# भाऊसाहेब राष्ट्रनिर्मितीत योगदान देणारे एक 'नेशन बिल्डर'

## शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख जयंती उत्सवात ना. देवेंद्र फडणवीस

प्रतिनिधी २८ डिसेंबर



**अमरावती :** स्वातंत्र्यानंतर राष्ट्रानिर्मितीत सातत्याने योगदान देणाऱ्यापैकी शिक्षण महर्षी कृषिरत्न डॉ.पंजाबराव देशमुख हे एक 'नेशन बिल्डर' असून 'फूड फॉर ऑल' ची मुहूर्तमेढ भाऊसाहेबांनी रोवली आहे त्यामुळे भाऊसाहेबांनी दाखविलेल्या शाश्वत मार्गाने चालण्याचाच आमचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या भव्य परिसरात आयोजित शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त आयोजित मुख्य समारंभात ते बोलत होते.संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर पद्मभूषण डॉ.विजय भटकर हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते.केंद्रीय आयुष मंत्री ना.प्रतापराव जाधव हे प्रमुख अतिथी म्हणून, महाराष्ट्राचे आदिवासी विकास मंत्री ना.डॉ.अशोक उईके, शालेय शिक्षण राज्यमंत्री ना.पंकज भोयर, राज्यसभा सदस्य खा.डॉ.अनिल बोंडे, अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, आमदार सौ.सुलभाताई खोडके, आ.परिणय फुके, आ.संजय कुटे, आ.राजेश वानखडे, आ.प्रवीण तायडे, आ.उमेश यावलकर, माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे, आ.आ.प्रताप अडसड यावेळी अतिथी म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमात श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे दिला जाणारा 'डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार' ना.देवेंद्र फडणवीस यांना पद्मभूषण डॉ.विजय भटकर यांच्या हस्ते देण्यात आला. आजपर्यंत मिळालेल्या देशविदेशातील पुरस्कारापेक्षा हा पुरस्कार अधिक महत्त्वाचा असल्याचे फडणवीस सटकला उत्तर देताना म्हणाले.आपल्या भाषणातून भाऊसाहेबांच्या कार्याचा समग्र आढावा घेऊन मुख्यमंत्री म्हणाले की, मानवतेला नाकारणाऱ्या लोकांना नाकारण्याचे काम डॉ.पंजाबराव देशमुख यांनी केले आणि आपल्या कृतीतून व व्यक्तिगत जीवनात त्या विरुद्ध बंड पुकारले. कर्जलवाद बिल आणून शेतकऱ्यांना सावकारी पाशातून बाहेर काढण्याचे काम सर्वप्रथम भाऊसाहेबांनी केले. पहिल्या जागतिक कृषी प्रदर्शनीच्या माध्यमातून देशविदेशातील तंत्रज्ञानाची ओळख शेतकऱ्यांना करून दिली. ते कृषी क्षेत्रातील सुधारणेचे जनक आहेत.

भाऊसाहेबांच्या नावाने असलेल्या पुरस्कारातून मला स्फूर्ती मिळेल म्हणून आपण हा पुरस्कार स्वीकारला असून नवीन तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमाने शेतीला कोरडवाहू पासून बागायतीपर्यंत आणण्याचा आपला प्रयत्न आहे व त्यासाठी विविध योजनांवर काम सुरु आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या सर्वच मागण्या आम्ही पूर्ण करणार आहोत सोबतच ना.भोयर यांनी मागणी केल्याप्रमाणे अमरावती येथील शिक्षण विभागाच्या सर्व विभागीय कार्यालयाला मिळून 'डॉ.पंजाबराव देशमुख' यांच्या नावाने एकच प्रशासकीय भवन तयार करता येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

**ना. प्रतापराव जाधव**

शेतकऱ्यांचा आत्मसन्मान वाढविण्याचे कार्य भाऊसाहेबांनी केले, या संस्थेला समाज घडविण्याचे एक प्रभावी माध्यम बनविले असून संस्थेने भाऊसाहेबांच्या विचारांना सातत्याने कृतीत उतरविण्याचे काम केले आहे व सामाजिक बांधिलकी जपली आहे, असे केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव म्हणाले.

पद्मभूषण डॉ.विजय भटकर यांनी आपल्या भाषणातून संस्थेच्या कार्याचा गौरव करून आपल्या उपक्रमाची माहिती दिली व पुरस्कारासाठी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले.शालेय शिक्षण राज्यमंत्री ना.पंकज भोयर यांचेही यावेळी भाषण झाले.

**संस्थाध्यक्ष हर्षवर्धन देशमुख**

शिक्षण आणि कृषी या दोन्ही विषयात भाऊसाहेबांच्या विचारांशी बांधिलकी ठेवून संस्था विविध उपक्रम राबवीत आहे असे सांगून कार्यक्रमाचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविक व अध्यक्षीय भाषणातून संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

**विविध पुरस्कार**

या कार्यक्रमात मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांना 'डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.पाच लक्ष रुपये, मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप असून मुख्यमंत्र्यांनी या पुरस्काराची रक्कम संस्थेला भेट दिली. मानपत्राचे वाचन संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ यांनी केले.

या कार्यक्रमात अकोला जिल्ह्यातील शेलू येथील श्रीमती सुवर्णा अरविंद गावंडे यांना शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्काराने, अकोला जिल्ह्यातील दानापूर येथील गोपाल किसनराव येऊल यांना शेतकरी नेते शरद जोशी उत्कृष्ट पुरुष शेतकरी पुरस्काराने, वाशिम जिल्ह्यातील खरोळा येथील दीपक सुभाष वारकड यांना डॉ.पंजाबराव देशमुख शेतीनिष्ठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.प्राचार्य डॉ.हनुमंत लुंगे यांनी दिलेल्या दाननिधीतून कस्तुरबा शाळेतील कु.भक्ती गजानन चौधरी हिला 'डॉ.पंजाबराव देशमुख क्रीडारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**विविध शिष्यवृत्ती**

डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातील जयश्री प्रवीण चितारे व साक्षी दिलीप सोरते हिला श्रीमती विमलाबाई देशमुख अभ्यासवृत्ती, श्री शिवाजी कृषी महाविद्यालयातील कु.अश्विनी दीपकसिंग पवार व कु.ऋतुजा भास्कर घोडके, श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयातील कु.स्वामिनी महेश धर्माळे व श्री शिवाजी कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील कु.पायल राजेंद्र देशमुख हिला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती वितरीत करण्यात आली.

पाहुण्यांचे स्वागत कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित असलेले संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजाननराव पुंडकर, ॲड.जे.व्ही.पाटील पुसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेशदादा खोटरे, प्रा.सुभाष बनसोड, संस्थेचे सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, विजय ठोकळ, प्राचार्य डॉ.पी.एस.वायाळ, प्राचार्य अमोल महल्ले यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे संचालन डॉ.मनीष गायकवाड यांनी केले तर कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी आभार मानले.कार्यक्रमाला संस्थेचे आजीव सदस्य, आजी माजी प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, विद्यार्थी व विदर्भातून आलेले विविध जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रत्नाबाई राठी हायस्कूल दर्यापूर येथे लोकवर्गणीतून सोलर प्रकल्पाची उभारणी




प्रतिनिधी २८ डिसेंबर

**दर्यापूर:** रत्नाबाई राठी हायस्कूल दर्यापूर येथे देणगीतून सोलर प्रकल्पाचे माननीय अध्यक्ष श्री हर्षवर्धनजी प्रतापसिंहजी देशमुख,(अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती) यांच्या हस्ते थाटामाटात उद्घाटन संपन्न झाले. रत्नाबाई राठी हायस्कूल चे प्रभारी मुख्याध्यापक श्री विलास मुळे तथा सर्व शिक्षक शिक्षिकेच्या सहकार्याने रत्नाबाई राठी हायस्कूल चे माजी मुख्याध्यापक तथा माजी शिक्षक यांच्या देणगीतून दोन लाख ५० हजार रुपये किमतीचा सौर ऊर्जा प्रकल्प स्थापन करण्यात आला त्या सौर ऊर्जा प्रकल्पाकरता मा.गोपालराव वा.बारब्दे माजी मुख्याध्यापक रत्नाबाई राठी हायस्कूल दर्यापूर, मा. श्री हेमंत जी शेंडे माजी मुख्याध्यापक रत्नाबाई राठी हायस्कूल, दर्यापूर मा.श्री हेमंतजी रेचे माजी मुख्याध्यापक रत्नाबाई राठी हायस्कूल ,दर्यापूर माननीय श्री गोपालराव गौरखेडे माजी मुख्याध्यापक रत्नाबाई राठी हायस्कूल , दर्यापूर श्रीमती पुष्पाताई भोसले माजी शिक्षिका रत्नाबाई राठी हायस्कूल दर्यापूर, माननीय श्री दीपकराव हिरुरकर माजी मुख्याध्यापक रत्नाबाई राठी हायस्कूल, दर्यापूर, माननीय श्री राजेंद्रजी गायगोले माजी मुख्याध्यापक रत्नाबाई राठी हायस्कूल, दर्यापूर या सर्वांनी अगदी सहजतेने व उदार मनाने या सौर ऊर्जा प्रकल्पाला मदत केली त्यामुळेच आम्ही ऊर्जा प्रकल्प उभारू शकलो . यामुळे शाळेला येणारे महिन्याचे ०५ ते ०६ हजार रुपये बिलाची बचत होणार आहे त्याबद्दल वरील सर्व माजी मुख्याध्यापकांचे व श्रीमती पुष्पाताई भोसले मॅडम यांचे आभार व अभिनंदन करण्यात येत आहे.वरील सर्व देणगी दात्यांचा कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री हर्षवर्धनजी प्रतापसिंहजी देशमुख साहेब यांनी शाल श्रीफळ व रोपटे देऊन सर्वांचा सत्कार केला आहे.

# नाम फलकाचा उद्घाटन सोहळा संपन्न

## मदारी गारुडी भटक्या जमाती सेवा समितीचे आयोजन

प्रतिनिधी २८ डिसेंबर



**चांदुर रेल्वे :** चांदुर रेल्वे शहरातील शिवाजीनगर येथे मदारी गारुडी भटक्या जमाती सेवा समिती महाराष्ट्र राज्य रजि नो. महाराष्ट्र २००१/ २०२५ यांच्या अंतर्गत गारुडी मोहल्ला येथे मदारी गारुडी भटक्या जमाती सेवा समिती या नाम फलकाचे उद्घाटन प्रदेश अध्यक्ष इक्बाल मदारी व सामाजिक कार्यकर्ते राजीक शेख , पप्पू मदारी ,जमीर खान मदारी, जब्बार मदारी, रौप खा मदारी , रशीद मदारी यांच्या हस्ते करण्यात आले.

मदारी गारुडी भटक्या जमाती सेवा समिती भटक्या जमाती गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी स्वतःच्या पोटाची खडकी भरण्यासाठी दिवस रात्र भटकंती करणाऱ्या समाजाचे एकत्रीकरण करून त्यांच्या जीवनमान उंचावण्यासाठी मदारी गारुडी भटक्या समाज जमा जमाती सेवा समिती या नाम फलकाचे उद्घाटन करण्यात आले. समाजाचे प्रश्न, त्यांचे राहणीमानाचे जीवन उंचावण्यासाठी, भटक्या जमातीला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सदर समिती कार्य करील असे यावेळी सांगण्यात आले,

यावेळी तालुका अध्यक्ष म्हणून इनुस् मदारी, रियाज मदारी, सद्दाम मदारी, सादिक मदारी, अमीर मदारी, अखिल मदारी, ताज मदारी, रहीम मदारी ,नबी मदारी ,मोसिन मदारी, साबीर मदारी, आसिफ मदारी, सहजाद मदारी ,फारूक मदारी, शेख ताहीर मदारी ,समीर खान मदारी, गणीभाई मदारी, उमर मदारी, जानी मदारी ,रहीम मदारी, अब्दुल मदारी जमीर खान मदारी अली भाई मदारी रमजान मदारी असोद्दीन मदारी, अलीम मदारी, फिरोज मदारी ,रोशन मदारी, मुजफ्फर मदारी ,जावेद मदारी, सलमान खान मदारी, प्रामुख्याने उपस्थित होते.

## बच्चू वानरे यांनी तिसऱ्यांदा नगरसेवक पदाची मारली बाजी

प्रतिनिधी २८ डिसेंबर



**चांदुर रेल्वे :** चांदुर रेल्वे नगरपरिषद च्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवक बच्चू वानरे यांनी तिसऱ्यांदा नगरसेवक होण्याचा बहुमान प्रभाग क्रमांक १ मधून मिळवण्यात यश प्राप्त केले.

नगर परिषद निवडणुकीत भाजपच्या तिकीटावर बच्चू वानरे प्रभाग क्रमांक १ मधून विजयी झाले असून बच्चू वानरे यांना ८५६ मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी रुपेश पुडके यांना २८३ केवळ मते मिळाली. ५७३ सर्वाधिक मतांनी विजयी होऊन विजयाची परंपरा कायम ठेऊन इतिहास रचला सर्वात पहिले २०११ मध्ये भाजपा च्या तिकीटावर नगरसेवक म्हणून विजयी झाले होते. त्यानंतर २०१६ मध्ये सुद्धा ३७८ मताच्या फरकाने विजयी झाले.निवडणूक लढवत मताधिक्याचा विक्रम रचला व विजयी झाले. राजकारण करीत असताना केवळ सामाजिक भान ठेऊन गोरगरीब जनतेच्या कल्याणाचा योजना त्यांच्या घरात पोहचविण्याचे काम व सुखदुखात सहकार्य १५ वर्षा पासून करत असून प्रभाग क्रमांक १ मध्ये अनेक विकासात्मक कामे करून घेतली.

कधीही स्वतःला नगरसेवक म्हणून न पाहता मी एक तुमचा जनतेच्या मनातला जनसेवक असल्याचा भास मनात ठेवला.

याच बाबीची प्रचिती म्हणून प्रभागातील नागरिकांनी तिसऱ्यांदा नगरसेवक निवडून दिले.

पक्षात पक्ष वाढी साठी सतत कार्य करीत राहिले व शहरात भाजपा पक्षाची बाजू मजबूत केली व आमदार प्रताप अडसड यांच्यावर कार्यावर विश्वास ठेऊन जनतेच्या मनातला जनसेवक नगरसेवक बनला. प्रभागातील व शहरातील विविध समस्या पूर्ण करण्यासाठी विविध आंदोलने केली,मोकाट वराह चा बंदोबस्त करण्यासाठी स्वतःवर गुन्हे सुद्धा दाखल झाले.


अनेक व शहरातील नागरिकांना वराह प्रकोपा पासून दिलासा मिळाला. तसेच १५ वर्षाचे नगरसेवक कार्यकालात प्रभागातील तसेच शहरातील जनतेचे कार्य करुन प्रभावित करून त्यांचे प्रेम प्राप्त केले. त्याच मुळे शहरातील व प्रभागातील नागरिकांनी तिसऱ्यांदा नगरसेवक पदाची माळ गळ्यात टाकली.

# पोलीस आयुक्तालय हद्दीमधील ३७ कारखान्यांची तपासणी

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**अमरावती :** अमरावती शहरात अंमली पदार्थ विक्रीचे प्रकरणे मोठ्या प्रमाणात वाढले असुन त्यावर आळा बसावा त्या अनुषंघाने मा.पोलीस आयुक्त राकेश ओला साहेब यांचे आददेशाने आयुक्तलयातील कारखाने/फॅक्टरीज तपासणी करण्याची मोहीम आज दिनांक २५/१२/२०२५ रोजी अमरावती शहर पोलीसांतर्फ राबवीण्यात आली.

सदर मोहीमे दरम्यान पोलीस स्टेशन राजापेठ, बडनेरा, वलगाव, नांदगापेठ तसेच गुन्हे शाखेचे वार पथक तैनात करण्यात आले होते. आयुक्तालय हददी मधील बंद पडलेले व चालु कारखाने/फॅक्टरीज येथे अचानक पणे भेटी देवुन कोणत्याही प्रकारचे अवैध्यरीत्या अंमली पदार्थ तसेच बनावटी दारू यांचा साठा किंवा निर्मीती करण्यात येते का या करीता आयुक्तालय हददी मधील एकुण ३७ बंद व चालु कारखाने/ फॅक्टरीज यांना भेटी देवुन त्यांचे डॉक्युमेन्ट तसेच सर्व परीसराची पाहणी करून सर्व कारखाने/फॅक्टरीज संचालकाना सुचना देण्यात आले. यापुढेही अमरावती आयुक्तालय हददीत अशाच प्रकारची माहीम राबवुन शहरा मधे अंमली पदार्थाची विक्री किंवा साठवणुक होणार नाही यांबाबत वारंवार तपासनी करण्यात येईल.



# महात्मा फुले अर्बन को-ऑपरेटिव बँक लिमिटेड अमरावती बँकेचा रौप्य महोत्सव सांगता समारंभ

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नवीन प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा व स्मृतिगंध स्मरणिकेचे विमोचनाचा समारंभ

प्रतिनिधी २८ डिसेंबर




**अमरावती :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महात्मा फुले अर्बन को-ऑपरेटिव बैंक लिमिटेड अमरावतीबँकेच्या रौप्य महोत्सव सांगता समारंभ, नवीन प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा व स्मृतिगंध स्मरणिकेचे विमोचनाचा समारंभ काल पार पडला. हा समारंभ सिल्वर स्टार सेलिब्रेशन हॉल रहाटगाव, अमरावती येथे संपन्न झाला. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्रजी फडणवीस उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे अध्यक्ष माननीय. दिलीपराव लोखंडे यांनी केले. या कार्यक्रमांमध्ये बँकेने मुख्यमंत्री सहायता निधीकरिता रुपये ५,००,०००/- (अक्षरी पाच लक्ष रुपये फक्त) देणगी माननीय मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द केली व सामाजिक कामांमध्ये बँकेचा सहभाग नोंदवाला. या कार्यक्रमांमध्ये माननीय यांनी बँकेने केलेल्या कामकाजाचे विवेचन करून बँकेचे कामकाज समाधानकारक असल्याचे सांगितले. ज्या शहरांमध्ये चांगल्या आर्थिक संस्था असतात या शहरांचा चांगला विकास होतो असे प्रतिपादन केले. भविष्यात बँकेने आपला व्यवसाय आणखीन वाढवावा, टेक्नॉलॉजी मध्ये वाढ करावी, नवीन चांगले ग्राहक शोधावेत. बँकेच्या सुवर्ण महोत्सवाच्या वेळी बँक आणखीन मोठी झालेली असेल अशी अपेक्षा व्यक्त करून पुढील वाटचालीसाठी बँकेत शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास बँकेचे सर्व संचालक, कर्मचारी व मा.. पंकजजी भोयर (राज्यमंत्री गृह निर्माण शालेय शिक्षण सहकार व खनिकर्म महाराष्ट्र राज्य),. अनिलजी बोंडे (खासदार राज्यसभा) बळवंतराव वानखडे (खासदार),. आमदार रवि राणा, आमदार सुलभाताई खोडके, मा. आमदार श्री. उमेश उर्फ चंदू भाऊ यावलकर, मा. आमदार श्री. प्रवीणजी तायडे, मा. आमदार श्री. परिणय फुके, मा. आमदार श्री. संजयजी कुटे, मा. आमदार श्री. प्रतापदादा अडसड, मा. आमदार श्री. राजेशजी वानखडे, मा. आमदार श्री. केवलरामजी काळे, मा. श्री. प्रवीणभाऊ पोटे (माजी पालकमंत्री) इतर सर्वजण उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बँकेचे उपाध्यक्ष श्री प्रमोदराव कोरडे यांनी केले व त्यांनी सर्वांचे मनःपूर्वक या कार्यक्रमासाठी बँकेचे सभासद ठेवीदार कर्जदार हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिटी न्यूज सुपरफास्ट खामगाव

# विद्यार्थीनींना घेऊन जाणाऱ्या बसला अपघात

## १५ विद्यार्थिनी किरकोळ जखमी

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**खामगाव :** मानव मिशन Mhed 14 BT 4539 क्रमांका ची कुरणगाड ला जाणारी बस फेरी ही मुलींना घेऊन जात असतांना अचानक सुपो जिनिंग आणि टाकळी फाट्या च्या मधात कुठलेच वळण किंवा जोड रस्ता नसताना आयशर ने अचानक ब्रेक कसे काय मारले? हे न उलगडणारे एक कोडेच म्हणावे लागेल म्हणून समोर धावत असलेल्या आयशर क्र Mhed ४३ या ६९३१ याला मागून जोरदार धडक बसली यामुळे बस मध्ये बसलेल्या मुलींना किरकोळ दुखापत झाली त्यामुलींना पुढील उपचारासाठी येथील ग्रामीण रुग्णालय येथे नेण्यात आले यामध्ये वाहक जि आर खुजणारे सुद्धा किरकोळ जखमी झाले आहे तर चालक एस आर इंगळे हे पोलीस स्टेशन मध्ये रिपोर्ट साठी गेल्याचे समजले होते वृत्त लिहे पर्यंत कुठलीच तक्रार दाखल झाली नव्हती.



## दोन अल्पवयीन मुलींचा शोध; खामगाव पोलिसांनी पालकांच्या केले स्वाधीन

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**खामगाव :** शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झालेल्या दोन अल्पवयीन मुलींचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले असून, दोन्ही मुलींना सुखरूप त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई खामगाव शहर पोलिस ठाण्याचे ठाणेदार आर. एन. पवार, सहायक पोलिस निरीक्षक विकास पाटील, पोलिस उपनिरीक्षक रीना सदर, पोलिस हवालदार अर्चना उमाळे, विनोद शेळके, पोलिस कॉन्स्टेबल प्रभाकर मस्के, राम धामोडे, राजू आडवे, कैलास ठोंबरे तसेच सायबर पोलिस ठाणे, बुलढाणा यांच्या संयुक्त पथकाकडून करण्यात आली.

# सिटी न्यूज अकोला

रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५

http://epaper.citynewssuperfast.com


## पुत्रदा एकादशी आणि नूतन वर्षाचे औचित्य साधून खाटू श्याम संकीर्तन

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**अकोला:** अकोला शहरात मागील ब-याच वर्षापासून खाटू श्याम दरबार लावून कीर्तन करणारी तसेच शहरात व ईतर राज्यात खाटू श्याम चे श्रृंगार साठी सतत तत्परतेने कार्यरत असलेली श्री श्याम श्रृंगार समितीच्या वतीने दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता अकोला महानगराच्या श्री भगवान परशूराम चौक, खोलेश्वर येथे भव्य श्री श्याम संकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. ईटारसीच्या सुप्रसिध्द गायिका कृतिका मालवीय आणि दिल्लीचे सुप्रसिध्द गायक श्री शिवम शर्मा या संकीर्तन मध्ये गायनाची सेवा देणार आहे. पुत्रदा एकादशी – हिंदू धार्मिक ग्रंथ, पुराण आणि शास्त्रच्या आधारे संतान प्राप्ती, संतानशी निगळीत असलेले शारीरीक कष्ट, कार्य संबंधी कष्ट, विद्या अर्जन संबंधी कष्ट असणा-या भक्तांनी या दिवशी उपवास, जागरण, नामस्मरण, भजन आणि कीर्तन केल्यास त्यांचे सर्व प्रकारच्या कष्टांचे निवारण होत असते.

## महानगरात आंतरराष्ट्रीय जम्मा गायक सुशील बजाज यांच्या जम्मा जागरणचे आयोजन

प्रतिनिधी २८ डिसेंबर



**अकोला:** रामदेवबाबा श्यामबाबा सेवा समितीच्या वतीने महानगरात वर्ष समाप्ती व नववर्ष पूर्व संध्येवर रामदेवबाबा यांच्या भव्य जम्मा जागरण व भजन संध्येचे आयोजन करण्यात आले आहे.

पौष सुदी बुधवार दिनांक ३१ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता पासून गीता नगर परिसरातील रामदेवबाबा - श्यामबाबा मंदिरात आंतरराष्ट्रीय जम्मा व भजन गायक हैदराबाद येथील सुशील गोपाल बजाज यांचा रामदेवबाबा यांच्या अवतार कार्यावर भव्य जम्मा जागरण, भजन संध्या व दिव्य ज्योत दर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

## गोपाल येऊल दाम्पत्याचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान

प्रतिनिधी २८ डिसेंबर



**तेल्हारा:** तालुक्यातील दानापूर येथील शेतकरी भारताचे पहिले कृषीमंत्री, शिक्षणमहर्षी व कृषिरत्न उपाधीधारक भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त अमरावती येथील श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, मोर्शी रोड, पंचवटी चौक येथे भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात दानापूर येथील प्रगतशील भाजीपाला उत्पादक शेतकरी गोपाल किसनराव येऊल व सौ. शुभांगी गोपाल येऊल यांचा सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विदर्भातील उत्कृष्ट पुरुष शेतकऱ्यांसाठी प्रदान करण्यात येणारा ड्ढशेतकरी नेता स्व. शरद जोशी उत्कृष्ट पुरुष शेतकरी पुरस्कारड्ड गोपाल येऊल यांना प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख अध्यक्ष, शिवाजी शिक्षण संस्था होते. प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ज्येष्ठ संगणक शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर यांची उपस्थिती लाभली. तसेच केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, महसूल मंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री अशोक ऊईके, राज्यमंत्री सदस्य डॉ. अनिल बोंडे, विधानपरिषद सदस्य संजय खोडके तसेच आमदार संजय कुटे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

## आदिवासीवर पट्टेदार वाघाचा हल्ला

### आठ दिवसात तिसरी घटना, वन अधिकारी दाखल

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**अकोट:** शहापूर रूपागड, उमरा, जीतापूर, शहानुर, खैरखेड, पोपटखेड या पहाडी भागातील सर्वच गावात गेल्या दोन ते तीन महिन्यापासून वारंवार बिबट, पट्टेदार वाघ या हिंसक प्राण्यांनी दहशत निर्माण केली आहे. शुक्रवारी शहानुर मधील मोठ्या गाईवर वाघाने हल्ला केला. गावकऱ्यांनी आरडा ओरड करून पहाडामध्ये हाकलले पुन्हा तोच वाघ काल शनिवारी भरदुपारी डुकरावर हल्ला करताना नागरिकांनी पाहिला. शहापूर रूपा गट जिल्हा परिषद शाळेच्या मागील भागात शेतकऱ्यांना दिसून आला. गाय बकऱ्या बैल म्हैस व रानडुक्कर व आज रविवारी सकाळी ९.३० च्या दरम्यान आदिवासी शेतमजूर हुसेन



मैताब ४८, त्यांचा मोठा मुलगा नैतिक व लहान मुलगा विठू हे तिघेजणे शेतात गव्हाला शेतात पाणी देण्याकरता गेले असता यांच्यावर वाघाने हल्ला केला. यामध्ये शेजारी आदिवासी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात आरडा ओरडा व करत वाघाने पळ काढला.

जखमीला आकोट ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल केले. वैद्यकीय अधिकारी यांनी प्राथमिक औषधे उच्चार करून अकोला रेफर केले यावेळी या आदिवासी मैताब हुसेन यांच्यावर हल्ल्याची होण्याची माहिती पांडुरंग तायडे, सुभाष सुरत्ने, सरपंच पती विनायक सुरत्ने, यांनी तात्काळ माहिती देऊन वन विभागाला पाचारण केले.

शहापूर रूपागड येथे वनपरिक्षेत्र अधिकारी कहाळे, साबळे, तायडे, डिगर, वनरक्षक मजूर सह नंदेश्वर यांनी ताफ्यासह धाव घेऊन घटनास्थळाचा पंचनामा केला. वाघाच्या हल्ल्याच्या संदर्भात सरपंच राम मंगळे यांनी वन विभागाला तक्रार सुद्धा दाखल केली आहे यावेळी अवि भारसाकडे, बाबाराव सुरत्ने, निलेश सुरत्ने, सुनील सुरतने, प्रमोद सुरत्ने, गजानन तराळे, प्रमोद भारसाकडे, पटवारी राजेश खामकर, उपसरपंच राजेश सोलकर तसेच आदिवासी नागरिक व महिला उपस्थित होते.

## संतश्री सुधांशुजी महाराज यांच्या भक्ती सत्संग कार्यक्रमाचे आयोजन

**अकोला:** लाखो भक्तांचे आराध्य पु सुधांशूजी महाराज यांच्या दिव्य भक्ती सत्संगाचा मंगलमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून याची जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे.विश्व जागृती मिशन अकोला संस्थेच्या वतीने हा दिव्य सोहळा गुरुवार दि १९ फेब्रुवारी २०२६ ते २२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत श्री गोरक्षण संस्था प्रांगण, गोरक्षण रोड येथे होणार आहे. या दिव्य सत्संग सोहळ्यात रविवार दि २२ फेब्रुवारी रोजी सर्व भक्तांसाठी मंत्र दीक्षा कार्यक्रम होणार आहे.

## हिवरखेड पोलिसांनी दिले गोवंशाना जीवदान



प्रतिनिधी २८ डिसेंबर

**हिवरखेड:** पोलिसांनी ऑपरेशन प्रहार अंतर्गत गोवंशाना जीवदान दिले. तलाई येथे पोलिसांना एका इसमाला गोवंशासह अटक केली. आरोपी हा निर्दयपणे व कुरतयपणे गुरांना लाठी टोचत घेऊन जात असताना गोपनीय माहिती वरून पोलिसांनी आरोपीला अटक केली. आरोपी विरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अंतर्गत गुन्हा दाखल केला.

आरोपी जवळून गुरे, व टाटा गाळ्यासासह अंदाजे २ लाख २० हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला, आरोपी अब्दुल वहिद, अब्दुल लतिफ हा घुलघाटचा रहिवाशी असल्याचे नमूद आहे,

सदरची कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलिस अधीक्षक रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिक्षक निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हिवरखेड पोलिस स्टेशनचे ठाणेदार गजानन राठोड,

पोलिस कर्मचारी, प्रफुल पवार, प्रमोद चव्हाण, विनोद खर्डे, विजय फोकमारे, आकाश गजभार यांनी केली.

## आकांक्षा कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा वीर बाल दिवसानिमित्त अभ्यास दौरा

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**हिवरखेड:** येथील आकांक्षा कॉलेज ऑफ पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र आहे. त्या ठिकाणी स्वयंसहायता समूह शिक्षणक्रम व बाल संगोपन आणि रंजन शिक्षणक्रम असे अभ्यासक्रम चालवले जातात. वीर बाल दिवसाचे निमित्त साधून पुनर्वसित आदिवासी परिक्षेत्रात दोन्ही अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा (आमोना) कासोद या ठिकाणी अभ्यास दौरा झाला.

या अभ्यास दौऱ्यात अभ्यास केंद्रातील विद्यार्थ्यांनी पुनर्वसित पालकांच्या भेटी घेतल्या तेथील माता पालक व बालकांना समुपदेशन केले. त्यांची माहिती गोळा केली व त्यांना वन्य प्राण्यांपासून कशा पद्धतीने शूरतेने लढावे लागते यासंदर्भात



माहिती सुद्धा घेतली. त्यांच्यामध्ये असलेल्या कौशल्यांचा परिपूर्ण अभ्यास या सर्व विद्यार्थ्यांनी केला बालकांचा परिपूर्ण अभ्यास (केस स्टडी) या अभ्यासक्रमात असल्याने संपूर्ण विद्यार्थ्यांना या अभ्यास दौऱ्याची खूप मदत झाली व त्यामध्ये प्रत्येकाने सक्रिय सहभाग घेतला सोबतच विद्यार्थ्यांनी वीर बाल दिवसाच्या निमित्ताने अमोना या परिसरात प्रभात फेरी काढली आणि घोषणा देऊन बालकांचे व पालकांचे मनोबल वाढविले या अभ्यास दौऱ्याचे यशस्वी आयोजन अभ्यासकेंद्राचे केंद्र संयोजक प्रा. वैष्णवी मयूर लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास दौऱ्याचे समन्वयक प्रा. जयश्री ठाकरे यांनी केले विद्यार्थ्यांनी त्या परिसरातील सर्व बालक, पालक, तसेच माता पालकांच्या सुद्धा भेटी घेऊन त्यांना समुपदेशन केले. काही ठिकाणी प्रत्यक्ष अनुभव सुद्धा घेतला हा अभ्यास दौरा फारच फलदायी व उपयुक्त ठरला. या अभ्यास दौऱ्यासाठी राधा रहाटे, वृषाली मसाळ, राधा ठाकरे, प्रतीक्षा बंड, शारदा चव्हाण, माधुरी काळे, अरुणा बेदुरकार, ममता ठवकर, गुंजन अग्रवाल, अनुश्री सेवक यांनी पुढाकार घेऊन हा अभ्यास दौरा यशस्वी संपन्न केला.

## डॉ. पंजाबरावांचे कार्य घराघरापर्यंत पोहचावणार, भारत कृषक समाजाचा संकल्प



प्रतिनिधी २८ डिसेंबर

**अकोला:** स्वतंत्र भारताचे पहिले कृषी मंत्री तसेच भारत कृषक समाजाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती दिना निमित्त भारत कृषक समाज महाराष्ट्र तर्फे आयोजीत कार्यकर्ता मेळाव्यात डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांचे कार्य घराघरात पोहचवण्याचा संकल्प केला. कै. भाऊसाहेबांनी शिक्षण क्षेत्र, शेती क्षेत्रात तसेच समाजातील सर्व घटकांचा सर्वांगीण विकास व्हावा या विचाराने आयुष्यभर झटत राहिले. भाऊसाहेबांच्या निस्वा:र्थी कार्यामुळे त्यांनी सर्व जाती धर्मातील लोकासाठी केलेल्या सेवेमुळे ग्रामीण भागात डॉक्टर, वकील, प्राध्यापक, शिक्षक प्रगतीपथावर आहेत. भारत कृषक समाजाचे चेअरमन डॉ. प्रकाश मानकर, अरविंद पाटील, दिलीप ठाकरे, अनिल चतरकर, डॉ. सुधीर पाटील, माधव भारसाकळे, सारंग बढे, कैलास इंगळे व इतर सदस्य उपस्थित होते. भाऊसाहेबांना अभिवादन करण्यात आले.

## निधन वार्ता

### श्रीकृष्ण ढोरे



**अकोला:** शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख श्रीकृष्ण प्रल्हाद ढोरे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. कट्टर शिवसैनिक, लेखक म्हणून त्यांनी ठसा उमटवला होता. रविवारी दुपारी मलकापूर स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. समाजाच्या विविध क्षेत्रातील नागरिक ढोरे यांना अंतिम निरोप द्यायला उपस्थित होते.

## आझाद समाज पार्टीतर्फे मनुस्मृती दहन

### अशोक वाटिके समोर झाला कार्यक्रम

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**अकोला:** दरवर्षी २५ डिसेंबर रोजी मनुस्मृतीचे दहन केले जाते. त्याचप्रमाणे, यावर्षी २५ डिसेंबर २०२५ रोजी आझाद समाज पार्टीच्या वतीने अकोला येथील अशोक वाटिका समोर मनुस्मृती जाळून आनंद साजरा करण्यात आला.

मनुस्मृती दहनाचा हा कार्यक्रम आझाद समाज पार्टीचे अकोला जिल्हाध्यक्ष विजय नरवाडे यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. या कार्यक्रमात स्थानिक भीम सैनिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

यावेळी प्रामुख्याने आझाद समाज पार्टीच्या अकोला जिल्हा महिला आघाडीच्या अध्यक्षा कांचन महाजन, सचिव अनुराधा ढिसाळे, सहसचिव नंदिनी खंडारे, उपाध्यक्ष जिजाबाई खडसे, उपाध्यक्ष वैशाली शिरसाट, महिला सदस्य उर्मिला चक्रनारायण, संघमित्रा तायडे, ज्योती वानखडे, नेहा सुरवाडे, उषा वानखडे, विमल शिरसाट उपस्थित होत्या. तसेच वाशिम जिल्हा आझाद समाज पार्टीचे अध्यक्ष सुभाष अंभोरे, उद्योजक राजेश इंगळे, वाशिम जिल्ह्याचे ज्येष्ठ समाजसेवक मिलिंद उसे साहेब, अकोल्यातून प्रा. गणेश बोरकर सर, ॲड. प्रजानंद उपर्वट, देवानंद गवई शिर्ला, संजय मेश्राम, बलदेव इंगळे, दीपक शिरसाट, आनंदा पळसपगार, यशवंत इंगोले, अरविंद तेलगोटे (नवथळ), सिद्धार्थ ओहेकर, राजेश वानखडे, गौतम घायवट, विजय वानखडे, हिम्मतराव सदांशीव, गणेश मेश्राम, प्रा. गजानन किरतकार, महेंद्र बोराडे, दादाराव सरकटे आणि फोटोग्राफर दीक्षा वानखडे आदी कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.



## मृतक मुब्बशिर खान परिवाराला खासदार अनुप धोत्रे यांची सांत्वन भेट



प्रतिनिधी २८ डिसेंबर

**आलेगाव :** येथील अल्पभूधारक शेतकरी मुब्बशीर खान रुमखान वय वर्षे ५५ हे आपल्या शेतामध्ये रात्रीचे वेळेस शेतपिकाला पाणी देत असताना अचानक त्यांच्या छातीमध्ये दुखायला लागले, त्या नुसार उपस्थित त्यांनी त्यांच्या मुलाला सांगितले.लगेच मुलाने उपचारार्थ दवाखान्याची तयारी केली असता त्यांचा मृत्यू हृदय विकाराने झाल्याचे कळले.त्यामुळे, सदर कुटुंबाचा कर्ता पुरुष कुटुंबाला सोडून गेल्याने सदर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.सदर कुटुंबाला शाब्दिक व औपचारिक आधार मिळावा या अनुषंगाने अकोला जिल्ह्याचे खासदार अनुपजी धोत्रे यांनी दिनांक २६ रोजी खान परिवाराला सांत्वनपर भेट देऊन कुटुंबाची विचारपूस करून दुःखद घटनेची माहिती घेतली.आणि कुटुंबातील सदस्यांना धीर देत.सदर कुटुंबाला शासकीय मदत मिळावी या अनुषंगाने तलाठी शंकर लोखंडे यांना भ्रमणध्वनी द्वारे संपर्क करून स्वर्गीय गोपीनाथजी मुंडे योजनेतून लाभ मिळवून देण्यासाठी सूचित केले.या वेळी ग्राम पंचायत सरपंच गोपाल गणपतराव महल्ले, रमण जैन, भिकाभाऊ धोत्रे, प्रेमानंद श्रीरामे, चंद्रकांत अंधारे, गोलू धाईत, नय्यर खान आदींची उपस्थिती होती.

## ऐतिहासिक कार्यक्रमात बाळ काळणेंचा सत्कार

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**अकोला:** २७रोजी १९६० ते २०१५ पर्यंतचे माजी विद्यार्थ्यांचा हा महा मिलन सोहळा न्युईराविश्वविक्रमी कार्यक्रमात विश्वविक्रमी बाळ काळणेंचा महासम्मान : अकोला आज दि. २७ -१२-२५ रोजी १९६० ते २०१५ पर्यंतचे माजी विद्यार्थ्यांचा हा महा मिलन सोहळा न्युईरा हायस्कुल मध्ये पार पडला देश- विदेशातुन आलेल्या सर्व विद्यार्थी हे अकराशेच्या वर होते . दिवस भर चाललेल्या हया कार्यक्रमात भावनिक मनोरंजन कार्यक्रम झाले. असा ऐतिहासिक कार्यक्रम झाल्यामुळे याला विश्व विक्रमी कार्यक्रम संबोधने योग्यच राहील . प्रमुख पाहुणे ब्रिग्रेडिअर सुहास कुळकर्णी, मा.माहुलकर मॅडम , मोहन गद्रे सर व सर्वच शिक्षक व हजारो मित्रांच्या उपस्थितीत सर्पमित्र तथा मानद वन्यजिव रक्षक बाळ काळणेंचा महा सम्मान करण्यात आला. कॅन्सर मुळे ७९ञ्ज् दिव्यांग झाल्यावरही सापां पासुन तर बिबट अस्वला सारखे वन्यजिव अविरत



पणे वाचवत आहेत . म्हणूनच त्यांची नोंद जागतिक स्तरावर वर्ल्ड ग्रेटेस्ट रेकॉर्ड व इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड त्यांना सम्मानित झाले आहेत हया विक्रमानेच मा. सुहास ब्रिग्रेडिअर यांनी बाळ काळणेंना म्हटले. मला फार आनंद आहे आपल्या सारख्या धाडसी वन्यजिव सेवाधारी व समाज सेवकाचा सम्मान करतांना. शाळेतील ५ माजी विद्यार्थीनिंचा सुद्धा सम्मान केला त्यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळालेला होता. तर शाळेतील इतर राज्यात नौकरीत धाडसी सेवा करणाऱ्यांचा सुद्धा सम्मान झाला . बाळ काळणेंची सेवा सम्मान वेळी टाळ्यांच्या आवाजाने त्यांच्या सेवेला फार मोठा मान मिळाला . शाळेचे मराठे सर, ठोके सर व माजी विद्यार्थ्यांनी हा महा कार्यक्रम घडवुन आणला. हायस्कुल मध्ये पार पडला. देश- विदेशातुन आलेले ११०० वर विद्यार्थी उपस्थित होते. दिवसभर चाललेल्या कार्यक्रमात भावनिक मनोरंजन कार्यक्रम झाले. ऐतिहासिक कार्यक्रम झाला. प्रमुख पाहुणे ब्रिग्रेडिअर सुहास कुळकर्णी, .माहुलकर मॅडम, मोहन गद्रे व सर्वच शिक्षक व हजारो मित्रांच्या उपस्थितीत सर्पमित्र तथा मानद वन्यजिव रक्षक बाळ काळणेंचा महा सम्मान करण्यात आला. कॅन्सर मुळे ७९ टक्के दिव्यांग झाल्यावरही सापां पासुन तर बिबट अस्वला सारखे वन्यजिव अविरत पणे वाचवत आहेत . म्हणूनच त्यांची नोंद जागतिक स्तरावर वर्ल्ड ग्रेटेस्ट रेकॉर्ड व इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड त्यांना सम्मानित झाले आहेत.

## मुदतीत नोंद न झालेल्या पिकांची ऑफलाईन पाहणी

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**अकोला:** खरीप हंगाम २०२५ मध्ये विहीत मुदतीत ई- पीक पाहणीची नोंद न झालेल्या शेतक-यांच्या पिकांची ऑफलाईन पाहणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आल्या आहेत. संबंधित शेतकरी बांधवांनी ऑफलाईन पाहणीचे अर्ज २४ डिसेंबरपूर्वी ग्राम महसूल अधिका-यांकडे देण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. याबाबतचा शासन निर्णय १४ डिसेंबर २०२५ रोजी जारी झाला. त्यानुसार जमाबंदी आयुक्त तथा भूमी अभिलेख संचालक डॉ. सुहास दिवसे यांच्याकडून सर्व जिल्ह्यांना या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.




वाढदिवस शुभेच्छा

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक लोकप्रिय चॅनल आरआरसी नेटवर्क व सिटी न्यूज सुपरफास्टचे प्रतिनिधी

राकेश दुबे

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा

NETWORK

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

सिटी न्यूज सुपरफास्ट

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५

# जिल्ह्यात 'ऑल आऊट ऑपरेशन' राबविणार

## एस.पी. रस्त्यावर उतरणार; दारू पिऊन हुंदडणाऱ्या मद्यपींना सज्जड इशारा

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**यवतमाळ :** नववर्षाच्या स्वागतासाठी ३१ डिसेंबर रोजी यवतमाळ जिल्ह्यात पोलीस बंदोबस्तात मोठ्या प्रमाणावर वाढ करण्यात आली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महत्त्वाच्या चौकांमध्ये, गर्दीच्या स्थळांवर, हॉटेल्स, ढाबे तसेच प्रमुख महामार्गांवर विशेष पोलीस पथके तैनात राहणार आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि नववर्ष शांततेत साजरे करण्यासाठी "ऑल आऊट ऑपरेशन" राबिवण्यात येणार आहे.



पोलीस अधीक्षक कुमार चिंता स्वतः रस्त्यावर उतरून सर्व बंदोबस्ताचे निरीक्षण करतील. या दिवशी विशेष लक्ष वाहतूक नियंत्रण, महिला व मुलांच्या सुरक्षिततेसह सार्वजनिक स्थळांवर अनुचित व असामाजिक वर्तन रोखण्यावर असेल. पोलिसांनी नागरिकांना सज्जड इशारा दिला आहे की, सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन हुंदडणाऱ्यांवर तात्काळ आणि कठोर कारवाई केली जाईल. मद्यपी वाहन चालवू नयेत आणि रस्त्यावर गोंधळ निर्माण करू नयेत, असेही पोलिसांनी स्पष्ट सांगितले आहे. जिल्ह्यात "ऑल आऊट ऑपरेशन" राबवण्यात येणार असून संध्याकाळी ७ वाजेपासून सर्व पोलीस रस्त्यावर सक्रिय राहणार आहेत. यामध्ये स्थिर पथक, गस्त पथक, वाहतूक नियंत्रण पथके तसेच गर्दीच्या ठिकाणी पोलीस निरीक्षकांची उपस्थिती असेल. नागरिकांनी नियमांचे पालन करणे अनिवार्य असून, शांततेत व सुरक्षित पद्धतीने नववर्ष साजरे करण्याचे पोलिसांचे आवाहन आहे. पोलिस अधिकाऱ्यांनी हॉटेल्स, क्लब, ढाबे व सार्वजनिक ठिकाणांवर विशेष गस्त पथके ठेवली आहेत. तसेच महत्त्वाच्या चौकांवर वाहतूक नियंत्रित करण्यासाठी वाहतूक पथके सतत सतर्क राहणार आहेत. महिलांची व मुलांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी पोलिसांनी विशेष लक्ष ठेवले आहे.

पोलीस प्रशासनाचे हे कठोर उपाय नववर्ष आनंदात साजरे करण्यासाठी असून, नागरिकांनी नियमांचे पालन करून सुरक्षित वातावरण तयार करणे आवश्यक आहे. मद्यपान करून सार्वजनिक ठिकाणी हुंदडणाऱ्यांवर तात्काळ कारवाई केली जाईल, तसेच वाहन चालवताना मद्यपान टाळण्याचे इशारे पोलिसांनी दिले आहेत. यवतमाळ पोलिसांचे हे "ऑल आऊट ऑपरेशन" नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि नववर्ष शांततेत साजरे करण्यासाठी महत्वाचे आहे. नागरिकांनी नियमांचे पालन करून नववर्षाच्या आनंदात सहभागी होण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# गावठी कट्टा बाळगणाऱ्या इसमाला अटक

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**यवतमाळ :** पोलीस स्टेशन वसंतनगरच्या अधिनस्त पथकाला गोपनीय माहिती मिळाल्यानंतर २५ डिसेंबर रोजी हेलीपॅड मैदानाजवळून २१ वर्षीय हजरत बिलाल शेख मुसा, रा. मधुकरनगर याला ताब्यात घेतले. त्याच्या जवळ गावठी बनावटीचा देशी कटटा (रिव्हाल्वर) आणि एक जिवंत काडतुस आढळले. इसमाकडे अग्निशस्त्राचा परवाना नव्हता, त्यामुळे त्याच्यावर अवैद्य शस्त्र बाळगण्याचा गुन्हा नोंदवण्यात आला.

रेड ऑपरेशन पोलीस अधीक्षक कुमार चिंता आणि उपअधीक्षक हर्षवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

सहा. पो.नि सुगत पुंडगे, पो उपनिरीक्षक शिवानंद स्वामी, पोलीस कर्मचारी अशोक चव्हाण, प्रफुल्ल इंगोले, सुरेश राठोड आणि श्रीकात राठोड यांनी घटनास्थळी पंचासह सहभागी होऊन ताब्यात घेतले. पोलीस प्रशासनाने नागरिकांना इशारा दिला आहे की, कोणत्याही व्यक्तीने अवैध शस्त्र बाळगले असल्यास तत्काळ पोलीस स्टेशन वसंतनगरला माहिती द्यावी. माहिती गोपनीय ठेवली जाईल. पुढील तपास पो उपनिरीक्षक शिवप्रसाद आवळकर करत आहेत.



# घरफोडीतील सोन्याचे-दागिने जप्त; आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक ताब्यात

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**यवतमाळ :** यवतमाळ शहरातील सोनार लाईन परिसरात घरफोडीच्या गुन्ह्यात पोलीसांनी मोठी कामगिरी केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की प्रितेश उर्फ दादु संजय गेडाम (वय १९, रा. अंबिका नगर, सुराणा लेआऊट) व दोन विधीसंघर्षग्रस्त बालक सोन्याचे व चांदीचे दागिने विक्रीसाठी फिरत आहेत. पोलिसांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पथकासोबत सोनार लाईन परिसरात पेट्रोलिंग करत असताना आरोपी संशयास्पद स्थितीत



उभा असल्याचे आढळले. ताब्यात घेतले असता त्यांनी घरफोडीची कबुली दिली. आरोपी व बालकांनी पोलीस हद्दीतील शुभम कॉलनी, राधाकृष्ण नगरी, दांडेकर लेआऊट, स्वप्नील नगर व सुभाष नगर बडगांव येथे घरफोडी केली होती. ताब्यातील मुद्देमालात २५.१०० ग्रॅम सोन्याचे दागिने (किंमत २,५१,०००/- रुपये), २८०.४०० ग्रॅम चांदी (५८,८८४/- रुपये), घरफोडी करताना वापरलेली पांढरी सुझुकी कंपनीची कार (एम. एच २९ बी.वाय ९३०१, किंमत ५०,०००/- रुपये) यांचा समावेश आहे. एकूण मुद्देमालाची किंमत ३,५९,८८४/- रुपये आहे. सदर कारवाईत एकूण ६ घरफोडीचे गुन्हे उघड करण्यात आले आहेत. आरोपी व बालकांना पोलीस स्टेशन लोहारा येथे ताब्यात घेऊन पुढील तपास सुरु आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक यवतमाळ कुमार चिंता, अपर पोलीस अधिक्षक अशोक थोरात आणि पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सतिश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पथकातील प्रमुख सदस्यांमध्ये सपोनि मनिष गावंडे, पोउपनि गजानन राजमलु, सफौ से. साजिद, सफो योगेश गटलेवार, पोहवा अजय डोळे, पोहवा प्रशांत हेडाऊ, पोहवा रुपेश पाली, पोहवा योगेश डगावर, पोहवा रितुराज मंडवे, पोहवा चिन घुगे, पोहवा निलेश राठोड, पोशि सुनिल पेटणे, पोशि आकाश सहारे, पोशि आकाश सुर्यवंशी आणि पोशि देवेंद्र होले यांचा समावेश आहे.

# विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी स्पर्धा महत्त्वाच्या : ना.अशोक उईके

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**राळेगाव :** ग्रामीण भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींमध्ये प्रचंड गुणवत्ता दडलेली असून, योग्य संधी मिळाल्यास ते आपले कर्तृत्व सिद्ध करतात. खेळ व क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे. तालुकास्तरीय स्पर्धांच्या माध्यमातून हा उद्देश सफल होत असल्याचे मत राज्याचे आदिवासी विकास मंत्री ना. प्रा. डॉ. अशोक उईके यांनी व्यक्त केले.

जळका येथील प्रतिभा आश्रमशाळेत आयोजित तीन दिवसीय तालुकास्तरीय शालेय खेळ व क्रीडा




स्पर्धा–२०२५ च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल चौहान, राळेगाव भाजप तालुकाध्यक्ष छायाताई पिंपरे, तहसीलदार अमित भोईटे, गटविकास अधिकारी केशव पवार, सहायक गटविकास अधिकारी भारती इसाळ, गटशिक्षणाधिकारी नवनाथ लहाने, सरपंच सुषमा तुमराम, माजी जि. प. सदस्या उषाताई भोयर, माजी पं. स. सदस्या शीलाताई सलाम, संजय काकडे, बबनराव भोंगारे, सचिनसिंह चौहान, अरुण गोंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

खेळ व कला संवर्धन मंडळ, पंचायत समिती राळेगाव व केंद्र यांच्या वतीने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, २५ डिसेंबर रोजी स्पर्धांचे उद्घाटन झाले. ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थी-विद्यार्थिनी कबड्डी, खो-खो, लंगडी तसेच बुलबुल उत्सव, वैयक्तिक व सांघिक खेळांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी झाले आहेत. विद्यार्थ्यांचा उत्साह वाढावा व त्यांच्या उपजत गुणांना वाव मिळावा, या उद्देशानेच या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याचे गटविकास अधिकारी केशव पवार यांनी सांगितले. या तीन दिवसीय महोत्सवाचा बक्षीस वितरण व समारोप सोहळा शनिवार, दि. २७ डिसेंबर रोजी होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सुशीला तुमराम असतील. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील उपस्थित राहणार आहेत. यावेळी तहसीलदार अमित भोईटे, गटविकास अधिकारी केशव पवार, पोलीस निरीक्षक शीतल मालटे, मुख्याधिकारी गिरीश पारेकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कपिल गोटे, आरएफओ मेघा गुंडलवार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रवी डवरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धांच्या यशस्वीतेसाठी केंद्रप्रमुख डॉ. कल्पना डवले, हरिदास वैरागडे, संजय पांडे, मुकेशचंद्र भोयर, दीपेश शेंडे, क्रीडा सचिव सागर इझळकर, प्रतिभा आश्रमशाळेचे मुख्याध्यापक राजू रोहणकर, जि. प. शाळा जळका मुख्याध्यापक जगदीश ठाकरे व सर्व शिक्षकवृंद परिश्रम घेत आहेत. शिक्षक पतसंस्थेचे महेश सोनेकर यांनी विजेत्या संघांसाठी चषक उपलब्ध करून दिले.

# कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती गुलाब जाधव पदावरून पायउतार

प्रतिनिधी २८ डिसेंबर



**महागाव :** महागाव तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गुलाब लोभा जाधव यांना पदावरून पायउतार व्हावे लागले. समितीच्या १८ पैकी १६ संचालकांच्या वतीने अविश्वास ठराव जिल्हा अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात सादर करण्यात आला होता. जिल्हा अधिकारी व पीठासन अधिकारी, उपविभागीय अधिकारी श्री सखाराम मुळे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत हा अविश्वास ठराव १५ विरुद्ध शुन्य मतांनी मंजूर झाला.

अविश्वास ठराव महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनिमयन) अधिनियम, १९६३ च्या कलम २३(अ) अंतर्गत सादर करण्यात आला होता. ठरावामागचे कारण असे सांगण्यात आले की, सभापती जाधव समितीच्या कामकाजात मनमानी करतात, संचालकांना निर्णय प्रक्रियेत विश्वासात घेत नाहीत, आर्थिक व्यवहारात पारदर्शकतेचा अभाव आहे, मासिक सभेत चर्चा न करता आदेश देणे आणि बहुमताने मंजूर ठरावाची अंमलबजावणी न करणे. सदर निर्णयामुळे गुलाब जाधव यांना पदावरून पायउतार व्हावे लागले. बैठकीत उपस्थित संचालकांमध्ये रामेश्वर करपे, गजेंद्र देशमुख, वासुदेव नेवारे, किशोर देशमुख, विनोद राउत, कृष्ण राउत, निरंजन धनगर, रवि पवार (कोदंरी), उकंडा राठोड, पुंडलिक भुरके, परमेश्वर जाधव, विजय कृष्णापुरे, रितेश पुरोहित, विनोद भगत, पुष्पाताई ठाकरे यांचा समावेश होता.

# भटक्या-विमुक्तांच्या पालात लोकशाही अजून पोहोचली नाही

## पल्लवीताई रेणके राज्यकर्त्यांना सवाल

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**यवतमाळ :** स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरही भटक्या व विमुक्त जमातींना संविधानाने दिलेली लोकशाहीची फळे अद्याप मिळाली नाहीत, अशी खंत पल्लवीताई रेणके, प्रसिद्ध संविधान तज्ज्ञ आणि महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाच्या माजी सदस्य, यवतमाळ येथील समता मैदानात 'स्मृती पर्व-२०२५' या कार्यक्रमात व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या चौथ्या दिवशी विमुक्त जाती-भटक्या जमाती प्रवर्गाने आयोजित कार्यक्रमात पल्लवीताईंनी VJNT प्रवर्गातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचे भयावह वास्तव मांडले. त्यांनी सांगितले की, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना मिळालेले स्वतंत्र संवैधानिक संरक्षण भटक्या-विमुक्त जमातींना अजून मिळालेले नाही. "राज्यकर्त्यांकडे या जमातींना संरक्षण देण्याची मानसिकता नाही," अशी ती खंत व्यक्त करत म्हणाल्या.

पल्लवीताईंनी देशाच्या सर्वांगीण विकासासाठी या प्रवर्गाला संवैधानिक संरक्षण देणे राष्ट्रीय कार्य असल्याचे सांगितले आणि सर्वांनी संघटित होऊन लढा द्यावा असा आवाहन केले. त्यांनी राज्यकर्त्यांना प्रश्न केला की, स्वातंत्र्याच्या जवळपास ८० वर्षांनंतरही संविधानात नमूद केलेल्या 'दर्जा आणि संधी' का भटक्या विमुक्त जमातीला मिळाली नाही.

कार्यक्रमात दुसरे प्रमुख वक्ते प्रा. मोहन चव्हाण, राष्ट्रीय संयोजक, विमुक्त भटक्या जमाती संवैधानिक संरक्षण महासंघ यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी महात्मा फुले, शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचे भटक्या विमुक्त जनजातीच्या जीवनामध्ये योगदान स्पष्ट केले. त्यांच्या मते, बहुजनांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळाला, पण आजही हा अधिकार अंमलात नाही. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्था, आर्णीचे अध्यक्ष राजूदास



जाधव होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये धूपचंद राठोड, प्रा. डी. एस. चव्हाण, पी. पी. पवार, इंजिनिअर जवाहर राठोड, लक्ष्मीप्रसाद वाघमोडे, जगन राठोड, आर. के. चव्हाण, प्राध्यापक रघुनाथ चव्हाण यांचा समावेश होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. पी. पवार, तर आभार प्रदर्शन दिलिप बोरगमवार यांनी केले.

# गटविकास अधिकाऱ्यांनी घेतला 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज'चा आढावा

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**आर्णी :** आर्णी पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत अंबोडा येथे राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा सविस्तर आढावा पंचायत समिती आर्णीचे गटविकास अधिकारी आर. आर. खरोडे यांनी नुकताच घेतला. यावेळी ग्रामपंचायतींच्या कामकाजाची सद्यस्थिती, सुरू असलेली विकासकामे तसेच अभियानाच्या उद्दिष्टांची अंमलबजावणी यावर सखोल चर्चा करण्यात आली.

या आढावा बैठकीत ग्रामपंचायतींचे आर्थिक व्यवस्थापन, कर वसुली, स्वच्छता, पाणीपुरवठा, घनकचरा



व्यवस्थापन, डिजिटल सेवा तसेच नागरिकाभिमुख शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा तपशीलवार आढावा घेण्यात आला. अभियानांतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीने नियोजनबद्ध पद्धतीने विकास आराखडा तयार करून गुणवत्तापूर्ण कामे वेळेत पूर्ण करावीत, अशा स्पष्ट सूचना गटविकास अधिकारी खरोडे यांनी दिल्या. यावेळी त्यांनी ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय कार्यक्षमतेवर भर देत पारदर्शकता, वेळेत कामांची पूर्तता तसेच लोकसहभाग वाढविण्याचे आवाहन केले. शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे हेच या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच स्वच्छ भारत मिशन, जलजीवन मिशन, पंधरावा वित्त आयोग निधी, महिला व युवकांचा सहभाग तसेच शाश्वत उपजीविका उपक्रम यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. या आढावा बैठकीस पंचायत समितीचे विस्तार अधिकारी (पंचायत) गोविंद इंगोले, विस्तार अधिकारी (कृषी) सुरेश चांगोले, प्रतिष्ठित नागरिक व माजी पोलीस पाटील विलास राऊत, ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार ठेंगेकर, मुख्याध्यापक अंकुश मोरे, विकासगंगा समाजसेवी संस्था व रिलायन्स फाउंडेशनचे वैभव गायकी, अंगणवाडी सेविका लताताई पाटील, आशा वर्कर विश्रांती पाटील, आयसीआरपी रुख्मिना जाधव, ग्रामपंचायत कर्मचारी ज्ञानेश्वर जाधव, ग्रामपंचायत केंद्र चालक दिनेश पाटील, ग्राम रोजगार सहाय्यक कैलास राठोड, रास्त धान्य दुकानदार ज्ञानेश्वर जाधव तसेच बाबाराव आडे, शेषराव राठोड, प्रफुल राठोड, रमेश राठोड, दशरथ नरहरी, निळकंठ राठोड, गोपाल जाधव आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामुळे ग्रामपंचायती अधिक सक्षम, स्वयंपूर्ण व लोकाभिमुख बनतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# निम्न पैनगंगा प्रकल्पात ब्लास्टिंग

## सावळी सदोबात दहशत; अनियंत्रित स्फोटांमुळे घरे थरथरली

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**यवतमाळ :** विदर्भ–मराठवाड्याला जोडणाऱ्या खडका–खंबाळा परिसरात सुरू असलेल्या निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या कामाने सध्या वेग घेतला असला, तरी या कामादरम्यान होणाऱ्या अनियंत्रित व तीव्र ब्लास्टिंगमुळे सावळी सदोबा व परिसरातील गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

ब्लास्टिंगच्या प्रचंड आवाजामुळे व जमिनीला बसणाऱ्या जोरदार हादऱ्यांमुळे घरांची छपरे हादरत असून पत्रे हलताना दिसत आहेत. अचानक होणाऱ्या स्फोटांमुळे नागरिक दचकून जात असून दैनंदिन जीवन पूर्णतः विस्कळीत झाले आहे.

या परिसरात जिल्हा परिषदेची



शाळा असून, स्फोटांच्या आवाजामुळे लहान मुले प्रचंड घाबरून जात आहेत. सततचा मोठा आवाज व हादरे त्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यास घातक ठरू शकतात, अशी तीव्र चिंता पालकांनी व्यक्त केली आहे. महिलांवर व वृद्ध नागरिकांवरही या परिस्थितीचा गंभीर मानसिक ताण येत आहे.

विशेष म्हणजे, स्थानिक ग्रामसभेची परवानगी न घेताच ब्लास्टिंग सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. तसेच, सुरक्षिततेचे कोणतेही निकष पाळले जात नसल्याने जीवितहानीचा धोका निर्माण झाला आहे. नियम, कायदे व पर्यावरणीय अटी केवळ कागदावरच राहिल्या आहेत का, असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. या गंभीर प्रकाराकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत असून, संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांच्या संगनमताने जनतेच्या सुरक्षिततेशी खेळ सुरू असल्याची भावना तीव्र होत आहे.

विकास आवश्यक आहेच; मात्र तो मानवी जीव धोक्यात घालून होत असेल, तर असा विकास नेमका कोणासाठी? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. शासनाने या प्रकरणात तातडीने लक्ष घालून ब्लास्टिंगची सखोल चौकशी करावी, कठोर सुरक्षितता नियम लागू करावेत आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# पुसदमधील शाळांमध्ये मुलांना स्वेटरचे वितरण

प्रतिनिधी २८ डिसेंबर

**पुसद :** पुसद येथील नगर परिषद प्राथमिक मराठी शाळा क्र. 1 व नगर परिषद प्राथमिक हिंदी शाळा क्र. 1 मधील इयत्ता एक ते चार वर्गात शिकणाऱ्या मुलांमुलींना ग्राहक संरक्षण संस्थेच्या वतीने मोफत स्वेटरचे वाटप करण्यात आले. जागतिक ग्राहक दिनानिमित्त आयोजित या उपक्रमामध्ये महाराष्ट्र प्रदेश महासचिव सुरेश सिडाम यांच्या प्रयत्नातून आणि मार्गदर्शनात मुलांना थंडीपासून संरक्षण मिळावे, या उदात्त हेतूने हा कार्यक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भाजपा जिल्हाध्यक्ष व माजी जिल्हा परिषद अध्यक्षा डॉ. आरती फुपाटे होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. हरिभाऊ फुपाटे, दीपाली दिनेश जाधव, कृष्णा पाटील, लक्ष्मणराव अनखुळे, रघुपती बहाद्दूरे, प्रदेश महासचिव सुरेश सिडाम, वसंतराव गव्हाळे, प्रशांत कोटूरवार, रमेश बुरकुले, दिलीप



वावधने, तुषाल व्यवहारे उपस्थित होते. ग्राहक संरक्षण संस्था, पुसद तालुका, गेल्या अनेक वर्षांपासून अनाथालय, वृद्धाश्रम, बालसुधार गृह, महिला सुधार गृह इत्यादी सामाजिक उपक्रम राबवत आहे. महिला सुधार गृहातील मुलींना भविष्यात उदरनिर्वाह करण्यासाठी पिको फोल मशीन व अनेक शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले आहे. तसेच, सामान्य नागरिकांवर होणारे अन्याय व अत्याचार रोखण्यासाठी न्याय मिळवून देण्याचे कार्य संस्थेच्या टीमद्वारे सातत्याने केले जात आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप वावधने यांनी केले. तर सूत्रसंचालन मुख्याध्यापक काशिनाथ डाखोरे यांनी केले. शाळेच्या शिक्षिका: म्हेस्कर, सिहोतीया, माया कथळकर, सुनीता ठाकरे, संध्या बुटलेकर, जया फलटणकर, अलका देवकते, गजानन पुसदेकर, सुभाष बुरकुले, गणेश व्यवहारे, भिमाशंकर चाकोते, अनंता चतुर उपस्थित होत्या.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबत पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाद्वारे मुलांना थंडीत संरक्षण मिळाले तसेच सामाजिक जबाबदारी आणि समाजकल्याणासाठी संस्थेकडून केलेल्या प्रयत्नांची जाणीव दिली गेली. ग्राहक संरक्षण संस्थेचे प्रदेश महासचिव सुरेश सिडाम यांच्या मार्गदर्शनाखाली ही संस्था सतत समाजाच्या गरजु वर्गाच्या कल्याणासाठी काम करत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि. २८ डिसेंबर २०२५

ज्याचा वशिला, त्याचं कुत्र काशीला..

# भ्रष्टअधिकाऱ्यांची लाभार्थ्यांना सुट, स्व-दानासाठी अनुदानाची लुट !

## *पोकराला पोखरले, भ्रष्टाचाराने घेरले * चौकशी व तक्रारीतून धरले ...

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

राज्यात पोखरा योजना समाजातील शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचलीच नसल्याचे वास्तव आता समोर येत आहे. त्यामुळे शेताकऱ्यांच्या विकासाला नव्हे;तर संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि निवडक शेतकऱ्यांच्याच आर्थिक विकासाला वाव मिळाला असल्याची धक्कादायक माहिती हाती आली आहे. या योजनेत संपूर्ण जिल्ह्यात संगनमताने करोडो रुपयांची अफरातफर झाली असल्याचे अनेक पुरावे हाती लागले असून लवकरच चौकशीतून झालेल्या भ्रष्टाचाराचे बिंग फुटणार आहे. त्यामुळे कुपनानेच शेती खाल्याने पोखरा योजनेची माती झाली आहे. पोखरा योजनेला भ्रष्टअधिकाऱ्यांने पोखरले असून भ्रष्टाचाराने घेरले आहे.

सिटीन्यूज सुपरफास्टने उचलून धरलेले ' पोकरा ' प्रकरण आणि रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील शेतकरी वसंत खडसे यांनी योजनेतील गैरप्रकाराबाबत केलेली तक्रार संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधून घेत आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी यांनी चौकशीचे आदेश दिले असून त्या अनुषंगाने चौकशी समिती नेमण्यात आली आहे. सदर प्रकरणाची चौकशी व तपास सुरू करण्यात आला आहे. दि.२६ डिसेंबर रोजी उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके यांनी सदर गैरप्रकारातील चौकशीचा शुभारंभ केला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यांच्या समवेत तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने कायंदे सुद्धा होते. आणि त्यांना दाखल करण्यात आलेल्या संशयीत कागदपत्राची बितंबित माहिती असल्यामुळे गैरप्रकाराची चौकशी अधिक सुलभ होणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे तक्रारदार वसंत खडसे यांनी सोबत जोडलेले पुरावे आणि उपस्थित केलेले



मुद्दे किती ईमानदारीपूर्वक तपासले जातात याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. सदर प्रकरणात कृषी सहाय्याकापासून ते काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुद्धा हात ओले करून घेतले असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे सदर गैरप्रकाराची चौकशी पारदर्शक होणे खुप गरजेचे आहे. थातुरमातुर प्राथमिक चौकशी करून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्यास वरिष्ठ स्तरावरून व जिल्ह्याबाहेरील अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात यावी अशी मागणी करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

सदर प्रकरणात अनियमितता तर झालीच आहे. परंतु एकाच कुटुंबातील वेगवेगळ्या सदस्यांच्या नावावर लाखों रुपयांचे अनुदान दिले आहे. तर दुसरीकडे मात्र खऱ्या गरजवंत लाभार्थ्यांना बजेट संपले असल्याचे सांगून हेतुपुरस्पर डावलण्यात आले आहे. याबाबत अनेक तक्रारी समोर येत असून शेलुखडसे येथील वंचित शेतकऱ्यांनी पुन्हा पोकरा भाग - २ मध्ये आमचे गाव समाविष्ट करावे अशी मागणी केली आहे. कारण तक्रारदार यांनी सन २०१९ च्या डिसेंबर पासून सन २०२४ च्या मार्च पर्यंत एकाच कुटुंबात लाखों रुपयांचे अनुदान दिले असल्याचे पुरावे जोडले आहेत.

तर त्यात बोगस कागदपत्रांच्या आधारे विहीर आणि फळबाग लागवड न करता लाखों रुपयांचे अनुदान हडपले असल्याचे अधोरेखित केले आहे. हा तपास करण्यासाठी कोणत्याही विशेष तंत्रज्ञानांची आवश्यकता नसून शेलुखडसे येथील गट नंबर ६३३ मध्ये जाऊन पाहिल्यास सर्वकाही सहज लक्षात येते असे शेलुखडसे येथील सुज्ञ लोक बोलत आहेत. त्या अनुषंगाने तपास अधिकारी संतोष वाळके यांनी सदर गट नंबर मधील पाहणी केली असून याबाबत ते काय अहवाल सादर करतात याकडे केवळ शेलुखडसे वासियांचेच नव्हे; तर संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधले जात आहे. तक्रारदार यांनी सादर केलेल्या तक्रारीचा गांभीर्याने विचार करून अवलोकन केले तर सदर योजना म्हणजे ' ज्याचा वशिला त्याचं कुत्र काशीला ' या एका जुन्या म्हणी प्रमाणे राबविली असल्याचे स्पष्ट होत आहे.

### एकाच कुटुंबात दिलेल्या लाखों रुपयांच्या अनुदानाचा गोषवारा..

तक्रारदार यांनी सादर केलेल्या छायांकित पुराव्यावर नजर टाकली तर सहज लक्षात येते.३० डिसेंबर २०१९ ला या कुटुंबाने पाईप साठी १९हजार १२५ रुपये हे पहिले अनुदान घेतले आहे. त्यानंतर ३१ डिसेंबर २०२० रोजी तुषार संचाच्या नावावर १६ हजार ४२६ रुपये दुसरे अनुदान घेतले आहे. त्यानंतर १८ सप्टेंबर २०२१ ला बिजोत्पादन नावाखाली १८४० रुपयांचा लाभ घेतला आहे. तर २ फेब्रुवारी २०२२ रोजी पुन्हा तुषार संचाच्या नावावर १९ हजार ३५५ रुपयांचे अनुदान लाटले आहे. तर २ फेब्रुवारी २०२२ रोजी १९ हजार ३५५ आणि २९ मार्च २०२२ रोजी १९ हजार ३५५ रुपयांचे अनुदान तुषार संचाच्या नावावर आणि विशेष म्हणजे एकाच व्यक्तीच्या नावावर हडपले आहे. ही बाब या योजनेतील भ्रष्टाचार उघड करण्यासाठी खूप महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. त्यानंतर २ फेब्रुवारी २०२२ रोजी १ लाख ४ हजार ३५१ रुपये बागायती वृक्षारोपण नावाखाली असून त्याच व्यक्तीच्या नावावर पुन्हा ३० मे २०२३ रोजी बागायती वृक्षारोपण नावाखाली ६२ हजार ६९३ रुपयांचे अनुदान लाटले आहे. आणि त्याच गट नंबर ६३३ मधील सदस्याच्या नावावर २८ एप्रिल २०२३ ला १३ हजार ४३६ रुपये व ३० मे २०२३ रोजी १ लाख २१ हजार १५९ रुपये बागायती वृक्षारोपण नावाखाली अनुदानाची लुट केली आहे. आणि लक्षवेधी बाब म्हणजे जी विहीर पोकरा योजनेतून घेतली ती विहीर खोदण्याआधीच त्या गट नंबर मधील सदस्यांच्या नावावर फळबागेचे अनुदान आणि पुन्हा २ फेब्रुवारी २०२२ रोजी २ लाख ५० हजार रुपये विहिरीचे अनुदान लाटले. याचा अर्थ काय ? हा मोठा प्रश्न उपस्थित होत आहे. तर २९ मार्च २०२२ रोजी मेजबान किसान सहायता हे काय आहे त्यांनाच ठावूक ! पण या नावाखाली २ हजार रुपये अनुदान घेतल्याची नोंद आहे. आणि लगेचच ३० मे २०२२ ला ९९ हजार ५२१ रुपयांचे अनुदान ठिंबक सिंचन घटकाखाली हडपले आणि शेवटचे दि.७ मार्च २०२४ रोजी १० लाख ६२ हजार ३२७ रुपये घेतले असल्याची माहिती तक्रारीत वसंत खडसे यांनी उजागर केली आहे. एकीकडे सबंधित प्रशासनाचे अधिकारी आणि कर्मचारी एकच कुटुंबात लाखों रुपयांच्या अनुदानाची उधळपट्टी करतात आणि दुसरीकडे ८० टक्के शेतकऱ्यांच्या तोंडाला पानं पुसतात हा कुठला न्याय आहे ? असा प्रश्न तक्रारदार वसंत खडसे यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणाची कसून आणि पारदर्शक चौकशी व्हावी अन्यथा वरिष्ठ स्तरावर दाद मागावी लागेल असे तक्रारदार यांनी म्हटले आहे.




## थोडक्यात

### आपला पैसा आपला अधिकार अंतर्गत जिल्हास्तरीय शिबिर

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वित्तीय सेवा विभाग, अर्थ मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच राज्यस्तरीय बँकर्स समिती (एसँ्), महाराष्ट्र यांच्या निर्देशानुसार जिल्हा अग्रणी बँक, वाशिम यांच्या वतीने हक्क न सांगितलेल्या मालमत्तेचा निपटारा करण्याकरिता विशेष जनजागृती व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता ङहॉटेल दानीश एम्पायर जुनी नगर परिषद जवळ वाशिमङ येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या शिबिरामार्फत नागरिकांना विविध बँकांमधील अनाकलनीय व निष्क्रिय खात्यांची माहिती व पडताळणी, दाव्याची प्रक्रिया व आवश्यक कागदपत्रांबाबत सविस्तर मार्गदर्शन, संबंधित बँकांचे अधिकारी व प्रतिनिधींशी थेट संवादाची संधी तसेच ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून मालमत्तेची तपासणी करण्यासाठी मदत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या शिबिरामुळे नागरिकांना त्यांच्या आर्थिक हक्कांविषयी जागरूकता निर्माण होऊन निष्क्रिय मालमत्ता योग्य हक्कदारांपर्यंत पोहोचविण्यास मोठी मदत होणार आहे.शिबिरादरम्यान बँकिंग क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी, जिल्हा प्रशासनाचे प्रतिनिधी तसेच इतर संबंधित संस्थांचे अधिकारी उपस्थित राहून नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार यांनी दिली आहे.

### समृद्धीवर गॅन्ट्री उभारणीसाठी टप्प्याटप्प्याने वाहतूक बंद

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम अंतर्गत गॅन्ट्री बसविण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे. अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे व चांदूर रेल्वे तालुक्यात कि.मी. १०४६०८० ते कि.मी. १२०६३०० या दरम्यान हे काम दि. २७ डिसेंबर ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत पाच टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. प्रत्येक टप्प्यातील कामाच्या वेळी संबंधित वाहिनीवरील वाहतूक ४५ ते ६० मिनिटांसाठी पूर्णतः थांबविण्यात येणार असून, काम पूर्ण होताच वाहतूक पुन्हा सुरू करण्यात येईल. २७ डिसेंबर रोजी नगरगावंडी परिसरात मुंबई वाहिनीवर दुपारी २ ते ४ या वेळेत, २८ डिसेंबर रोजी नागपूर वाहिनीवर दुपारी २ ते ४ या वेळेत तर २९ डिसेंबर रोजी टिटवा परिसरात नागपूर व मुंबई दोन्ही वाहिन्यांवर ठरावीक वेळेत वाहतूक थांबविण्यात येणार आहे. या कालावधीत वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा व वाहतूक व्यवस्थेस सहकार्य करावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी केले आहे.

## लाभार्थी व अधिकारी जगले, वृक्ष नाही लागले ...

# रोपवाटीकेतच नाहीत वृक्ष, भ्रष्टाचारी दक्ष !


● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

रोजगार हमीच्या १०० कोटीच्या घोटाळ्यानंतरही मालेगाव तालुक्यातील घोटाळ्याचे सत्र थांबता थांबेना तालुक्यात रोजगार हमी अंतर्गत देण्यात आलेल्या रोपवाटीकाच कागदोपत्री असल्याचे सिध्द झाले आहे. रोपवाटीकेतील वृक्ष गायब असून त्यानंतर रोपवाटीकेतील वृक्षांवर राबविण्यात येणारी वृक्षारोपण योजना कुठे आहे साहेब असा प्रश्न पडला आहे. भ्रष्टाचारी दक्ष असले तरी त्यांनी काहीच न करता ४५ लक्ष रूपये काढल्याचा प्रकार समोर आला आहे.

वाशीम तालुक्यात कागदोपत्री रोपवाटीका व न झालेल्या वृक्षारोपणवर कोट्यवधीचा घोटाळा सिटी न्युज सुपरफास्टने उघड केला होता. आता मालेगाव तालुक्यात अस्तित्वात नसलेल्या चार रोपवाटिकांचे कुशलचे देयक काढण्यात आले असल्याचे माहिती आहे, सदर रोपवाटिका ह्या एसआयटी (विशेष चौकशी समिती) चौकशीत समाविष्ट होत्या, चौकशीने केलेल्या चौकशीमध्ये काही गंभीर बाबी समोर आल्याने सदर रोपवाटिकांचे देयक हे सन २०१८ पासून प्रलंबित होते, मात्र रोजगार हमी योजनेच्या घोटाळ्यात माहीर असलेल्या पंचायत समिती मालेगाव यांना यातूनही पर्याय काढून अस्तित्वात नसलेल्या व यासाठी चौकशीतगंभीर बाबी समोर आलेल्या रोपवाटिकांचे सुमारे ४५ लक्ष रुपये देयक काढले आहे, यामध्ये 'अर्ध्यात आम्ही अर्ध्यात तुम्ही' अशी डील झाल्याची माहिती समोर येत आहे, सदर डील ही रोहयो विभाग प.स.मालेगाव मधील 'दीपक' ने केल्याचे सिद्ध होत आहे, दीपक ने सदर प्रकरणात अर्थपूर्ण 'सावळा' गोंधळ घातल्याचे पुरावे सिटी न्यूज कडे आहेत, याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण चौकशीचे आदेश देऊन सदर घोटाळा बाहेर काढावा आणि दीपक चे कॉल डिटेल्स काढावे व चौकशी मध्ये दोषी आढळून येणाऱ्या बिडीओ व सीडीओ यांना तत्काळ निंलबित करावे अशी जनतेतून मागणी होत आहे.

### वाशीमनंतर मालेगावच्या रोपवाटीका गायब...

मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने रोजगार हमी योजनेअंतर्गत वाशीम तालुक्यात १४ रोपवाटीका कागदोपत्री असल्याचे प्रकरण सिटी न्युज सुपरफास्टने २०२२ मध्ये वृत्त मालिका प्रकाशित करून उघड केले होते. या भ्रष्टअधिकाऱ्याने चौकशी मॅनेज केली होती. जिओ टॅगवर रोपवाटीकेत एकही वृक्ष नसल्याचे पुरावे सिटी न्युज सुपरफास्टकडे उपलब्ध आहे. त्यानंतर यामधील भ्रष्ट तांत्रीक अधिकाऱ्याला लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी लाच स्वीकारतांना अटक केली. यावरून रोपवाटीकेसह इतरही विभागात भ्रष्टाचार झाल्याचे सिध्द झाले. मालेगाव तालुक्यातही रोपवाटीका गायब झाल्याचा प्रकार उघडकिस आला आहे .रोपवाटीकेतीच वृक्ष गायब झाल्याने वृक्षारोपण कुठे झाले साहेब असा सवाल नागरिक करीत आहेत.






## तारखा जाहीर होताच उमेदवार जागे,

# मतदानापुरतेच गावागावांत जावे लागे !

### जि.प.निवडणुका जाहीर नसताना, बाशिंग बांधून बसलेले उमेदवार जातात तरी कुठे?

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या की जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या इच्छुक उमेदवारांचे चेहरे अचानक गावोगावी दिसू लागतात. पत्नी, मुले, नातेवाईकांसह घरोघरी भेटी, नमस्कार, आश्वासनांचा पाऊस हे दृश्य सर्वांनाच परिचित आहे. विकासाची मोठी स्वप्ने दाखवली जातात, प्रत्येक दारात हजेरी लावली जाते.

मात्र सध्या निवडणुका जाहीर नाहीत, तेव्हा हेच बाशिंग बांधून बसलेले उमेदवार अचानक गायब होतात. त्यामुळे गावकऱ्यांच्या मनात स्वाभाविक प्रश्न उभा राहतो-हे लोक आता जातात तरी कुठे? आज कामासाठी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या दारात जाणाऱ्या नागरिकांना लोकप्रतिनिधी भेटत नाहीत. शेतकरी, शेतमजूर, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक यांचे प्रश्न प्रलंबितच राहतात. रस्ते, पाणी, घरकुल, रोजगार, आरोग्य, शिष्यवृत्ती अशा मूलभूत विषयांवर चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते; पण निवडून आलेले किंवा इच्छुक नेते मात्र उपलब्ध नसतात. निवडणुकीपुरतेच लोकांशी जिव्हाळा आणि उरलेल्या काळात संपूर्ण दुरावा अशीच स्थिती वारंवार अनुभवायला मिळत आहे.



गावकऱ्यांमध्ये आता स्पष्ट भावना तयार होत आहे की, हे नेते फक्त आणि फक्त मतदानापुरतेच मर्यादित असतात. निवडणूक जवळ आली कीच लोकांची आठवण येते; अन्यथा फोन बंद, भेटी टाळल्या जातात. त्यामुळे नागरिकांचा मतदानावरील विश्वास दिवसेंदिवस डळमळीत होत आहे. 'मत दिल्यावरही आमच्यासाठी उभे राहणारा कोणीच नाही,' अशी खंत अनेकांच्या बोलण्यातून व्यक्त होत आहे.सध्या हे नेते आपापल्या वैयक्तिक कामात, राजकीय डावपेचांत किंवा इतर सोयीसुविधांत व्यस्त असतात. नागरिक, शेतकरी, शेतमजूर, युवक मात्र विविध समस्यांमुळे त्रस्त असले तरी त्यांच्यासाठी वेळ काढण्याची फुरसत या नेत्यांना नसते. त्यामुळे निवडणुका नसताना हे नेते बाशिंग बांधून बसलेलेच दिसतात.मात्र ज्या क्षणी जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर होतात, त्याच क्षणी हेच नेते मुलाबाळांसह, पत्नींसह पुन्हा गावोगावी फिरू लागतात. विकासाच्या गप्पा, आश्वासनांची दारोदारी फेरफटका आणि लोकांशी जवळीक दाखवण्याचा प्रयत्न सुरू होतो.या परिस्थितीत गावकऱ्यांमध्ये एकच निष्कर्ष ठामपणे पुढे येत आहे. जो आपला, तोच आपलाच. रोजच्या अडचणींमध्ये जो खऱ्या अर्थाने सोबत उभा राहतो, तोच विश्वासार्ह ठरतो. केवळ निवडणुकीच्या वेळी दिसणाऱ्या चेहऱ्यांवर अवलंबून न राहता, कामाच्या काळातही उपस्थित राहणाऱ्या, प्रश्न ऐकणाऱ्या आणि सोडवणाऱ्या व्यक्तींनाच पाठिंबा देण्याची वेळ आता आली आहे.लोकशाही टिकवायची असेल, तर लोकप्रतिनिधींनी निवडणूक जाहीर नसतानाही गावकऱ्यांमध्ये राहणे, त्यांचे प्रश्न समजून घेणे आणि सोडवणे आवश्यक आहे. अन्यथा 'मत मागायला गावोगावी आणि कामाच्या वेळी गायब' ही प्रतिमा अधिक ठळक होत जाईल. आणि त्याची किंमत शेवटी सामान्य नागरिकांनाच नव्हे, तर लोकशाहीलाच मोजावी लागेल.

### जलसंधारण अभियानाला वेग देवून ३१ जानेवारीपर्यंत कामे पूर्ण करा-जिल्हाधिकारी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.०, जलयुक्त शिवार २.० तसेच गाळमुक्त धरण – गाळयुक्त शिवार ही शासनाची महत्त्वाकांक्षी व लोकाभिमुख अभियाने आहेत. या अभियानांमुळे पाण्याची उपलब्धता वाढून शेतीला शाश्वत आधार मिळणार आहे. त्यामुळे सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने, जबाबदारीने व गुणवत्तापूर्ण कामकाज करणे आवश्यक आहे. सुरू असलेली व प्रस्तावित सर्व कामे ठरवून दिलेल्या वेळेत पूर्ण करावीत. कोणत्याही परिस्थितीत कामांमध्ये दिरंगाई होता कामा नये.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. पाणलोट विकास घटक २.०, जलयुक्त शिवार २.० तसेच गाळमुक्त धरण – गाळयुक्त शिवार अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय आढावा बैठक जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा जलसंधारण अधिकारी शाम फेरवानी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी



आरीफ शाहा, आत्मा प्रकल्पाच्या संचालक अनिसा महाबळे, लघु पाटबंधारे विभागाचे जिल्हा जलसंधारण अधिकारी बिजवे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यंत्रणांकडून नियमित प्रगती अहवाल सादर करण्यात यावा आणि अडचणी असल्यास त्या तात्काळ प्रशासनाच्या निदर्शनास आणाव्यात, मागील काही दिवसात शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने तक्रारीवर तात्काळ कार्यवाही करावी असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले. बैठकीत गाळ मुक्त धरण गाळ युक्त शिवार अभियानांतर्गत अशासकीय संस्थांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते त्यावर चर्चा झाली आणि शासन निर्णय प्रमाणे कार्यवाही करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

बैठकीला जलसंधारण व कृषी विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५
http://epaper.citynewssuperfast.com

# अकोला विकासाची रंगली.... महाचर्चा







## भाजपमध्ये माझी घर वापसी : हरीश आलिमचंदानी



भारतीय जनता पक्षात घर वापसी झाली असून महापालिका निवडणूक भाजपच्या तिकिटावर लढणार असल्याचे माजी नगराध्यक्ष हरीश आलिमचंदानी यांनी सांगून उपस्थितांना चकीत केले. महाचर्चा कार्यक्रमातील ही ब्रेकिंग न्यूज ठरली.

राजकारण माझ्यासाठी सेवा कार्य आहे. झाले गेले विसरून जाऊन नव्याने सुरुवात करायची आहे. भाजपाच्या काळात पुष्कळ कामे झाली. शहरात मोठमोठे रस्ते, उड्डाणपूल, पक्क्या सर्विसलाईन झाल्या. लवकरात जिगाव प्रकल्पाचे पाणी अकोल्याला मिळणार आहे. राहिला प्रश्न अंडरपासचा तो सुद्धा दूर केला जाईल असे हरीशभाई आलिमचंदानी यांनी स्पष्ट केले.आलिमचंदानी यांच्या पुढाकाराने महापालिका निवडणुकीसाठी तिसरी आघाडी तयार करण्यात येत होती. परंतु मध्यंतरी त्यांची भाजपच्या वरिष्ठांशी बैठक झाली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे अकोला येथे आले होते तेव्हा त्यांनी असंतुष्टांशी चर्चा करू असे म्हटले होते. त्याचा प्रत्यय आलिमचंदानी यांच्या वक्तव्यातून आला ....

## नऊ इंच व्यासाची भूमिगत गटार.....

“आमच्या कार्यकाळात महापौर म्हणून बाळासाहेब आंबेडकर यांनी शहरात भूमिगत गटार योजना सुरू केली होती. मात्र, भाजप सत्तेवर आल्यानंतर या योजनेची अंमलबजावणी संथ गतीने सुरू असून काम अक्षरशः रखडले आहे. सध्या भूमिगत गटार योजनेत केवळ नऊ इंची व्यासाचे पाइप टाकले जात असून त्यांची दीर्घकालीन टिकाऊपणा संशयास्पद आहे. आर आर सी ने केवळ ही बातमी दाखविल्याचे निलेश देव या वेळी म्हणाले. केंद्र व राज्य शासन निधी देण्यास टाळाटाळ करत असल्याने मी मुंबई येथे उपोषणही केले होते. त्या वेळी अजित पवार यांनी आश्वासन दिले होते. उड्डाणपुलाच्या रखडलेल्या कामास भारतीय जनता पार्टी जबाबदार आहे. स्वाती इंडस्ट्रीजचा प्रश्न सर्वप्रथम आम्हीच उपस्थित केला, त्यामुळे खाजगी टॅक्स वसुली टळली. येत्या निवडणुकीत किमान १५ सेवक निवडून येतील, असा विश्वास वंचित बहुजन आघाडीचे महानगराध्यक्ष निलेश देव यांनी व्यक्त केला.”



## आर आर सी चे आभार

“आर. आर. सी. न्यूजच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘महाचर्चा’ कार्यक्रमाबद्दल आयोजकांचे मनःपूर्वक आभार. या चर्चेमुळे योग्य आणि कर्तव्यदक्ष नगरसेवक निवडण्याची संधी नागरिकांना मिळेल. शहरात अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. नागरिकांमध्ये वाहतूक शिस्तीचा अभाव असून त्याला वाहतूक प्रशासनही तितकेच जबाबदार आहे. शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनासोबतच नागरिकांनीही जबाबदारीने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे मत राजेश डोंगरकर यांनी व्यक्त केले. चर्चे मध्ये बसलेले सर्व एकमेकांचे भाऊ भाऊ आहेत, अकोला शहरात सर्वत्र एकमेकांसोबत नाश्ता करताना सगळयांना दिसतात, या कार्यक्रमांमध्ये भांडण करून जनतेला चुतीया बनवत आहेत, विनयकुमार पराशर यांनी अकोला शहर सुंदर केलं होतं येणाऱ्या नगरसेवकांनी त्या प्रकारे काम करावं

## काहींचा विकास बाकी भकास....

“शहरातील काही प्रभागांचा विकास झाला असला, तरी आजही अनेक प्रभागांत नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. पूर्वी राजे वेशांतर करून प्रजेच्या समस्या जाणून घेत असत; त्याच धर्तीवर सत्तेत असलेल्या लोकप्रतिनिधींनी शहरात फिरून नागरिकांच्या अडचणी प्रत्यक्ष अनुभवाव्यात. शहरात सध्या केवळ बसस्थानक आणि पंचायत समिती परिसरातच महिलांसाठी प्रसाधनगृहे उपलब्ध असून इतर भागांत त्यांचा अभाव असल्याने महिलांची मोठी कुचंबना होत आहे. तोष्णीवाल लेआउट परिसरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब असून त्याच्या दुरुस्तीचे नियोजन महापालिकेने तातडीने करावे. यंदा प्रत्यक्ष काम करणाऱ्या उमेदवारालाच मतदान करू, अशी ठाम भूमिका दिपाली देशपांडे यांनी मांडली.”

“आर आर सी नेटवर्कने विकसित अकोल्यासाठी महाचर्चाचे आयोजन केले त्याबद्दल आम्ही त्यांचे खूप खूप आभारी आहे. आतापर्यंतची निवडणुकी संपूर्ण जातीपातीच्या जोरावर चालत आलेले आहे अकोला शहरातील नागरिकांच्या समस्या तसेच तसे आहेत, येणार निवडणूक मध्ये नागरिकांनी योग्य नगरसेवक निवडून द्यावा जेणेकरून शहराचा विकास होईल, असे डॉ संदीप चव्हाण म्हणाले.

## पाण्याची मुळ समस्या जैसे थे

“अकोला शहरातील टॅक्सचा मुद्दा, शहरातील भुयारी गटर योजना तसेच शहरात नव्याने झालेल्या उड्डाणपुलाचा बट्ट्याबोळ झाल्याचे दिसून येत आहे..भाजपा आपले मनमानी करीत आहेत..जिगाव प्रकल्प बाबत मंगेश काळे त्यांनी नाराजी व्यक्त केली याचबरोबर अकोला शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी अकोट येतील पाणीपुरवठ्याची योजना कार्यान्वित करायला पाहिजे असेही मत त्यांनी व्यक्त केले. आर आर सी नेटवर्क राबविलेल्या महाचर्चा या कार्यक्रमाबाबत त्यांनी आनंद व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून आम्ही आमचे मत नागरिकांपर्यंत मांडू शकतो अशी भावना त्यांनी व्यक्त केली असून असे कार्यक्रम आर आर सी नेटवर्क राबवावे असे मंगेश काळे यांनी सांगितले.



## बंद शाळांवरुन स्थिती कळली

“शहरातील प्राथमिक शाळांचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. महापालिकेच्या बहुतांश शाळांची अवस्था दयनीय असून तातडीने सुधारणा होणे आवश्यक आहे. ठेकेदारांकडून निकृष्ट दर्जाची कामे सुरू असून सीमा विस्तार होऊनही अनेक नागरिकांना आपण अजूनही ग्रामपंचायत क्षेत्रातच राहतो आहोत, अशी भावना आहे. विकासकामांमध्ये सत्ताधाऱ्यांचा पक्षपात मोठ्या प्रमाणात दिसून येत असल्याचा आरोप आझाद समाज पार्टीचे अध्यक्ष विजय नरवाडे यांनी केला. महा चर्चेत अद्यापही डाबकी रोड आणि कॅनॉल रोड ची समस्या बाबत कोणीही बोलले नाही या प्रभागातील नागरिकांना किती हाल अपेक्षा सहन करावा लागत आहेत हे त्यांनाच माहीत शहरात नगरसेवक ५० लाख रुपये खर्च करून निवडून येतात ते काय शहराचा विकास करणार ही खरी शोकांतिका आहे शहरातील महापालिकांच्या शाळा बंद पडल्यामुळे लोकांना मोठा खर्च करून आपल्या मुलांना खाजगी शाळेत पाठवावे लागत आहे याला जबाबदार कोण परिस्थिती बदलण्यासाठी तरुणांनी पुढे यावे आम आदमी पक्षाला नागरिकांनी संधी द्यावी आम्ही रोजगार देऊ शकतो अशी प्रतिक्रिया आम आदमी पार्टीचे महासचिव यांनी दिली.”



## आमदार खासदार इंजिनिअर तरी....

“शहराचे आमदार आणि खासदार दोघेही इंजिनियर आहेत त्यामुळे रस्ते आणि उड्डाणपूलाचे काम दर्जेदार व्हायला पाहिजे होते परंतु अल्प कालावधीतच सिमेंट रस्ते आणि उड्डाणपुलाचे कामाचा पुरता बोजवारा उडाला आहे अमरावती आणि खामगाव शहर विकासाच्या बाबतीत अकोल्याच्या पुढे गेले आहे अकोला महापालिकेत भाजपाच्या केवळ दोघा भाऊंचीच जास्त चालते भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी कुत्र्यांच्या नसबंदीत सुद्धा पैसे खाण्याचे काम केले आहे सर्वात जास्त फायदा भाजपाने घेतला आहे ठेकेदार सुद्धा सगळे भारतीय जनता पार्टीचे आहेत केवळ मुलतानी मातीसारखे काम शहरात सुरू आहे यंदा मनसेचे सहा ते सात नगरसेवक निश्चित निवडून येतील आणि आम्ही भ्रष्टाचार विरोधात लढा देऊन अशी प्रतिक्रिया मनसेचे पूर्व नगरसेवक पंकज साबळे यांनी व्यक्त केली”

## आम्ही प्रश्न कोणाला विचारायचा

“या कार्यक्रमात सत्ताधारी आलेत नाही, आम्ही आमचे प्रश्न कोणाला विचारणार, लोकांच्या प्राथमिक सुविधी सत्ताधारी यांनी पुरवले नाही, अकोल्यात प्रॉपर्टी मध्ये भ्रष्टाचाराचा पूर्ण पैसा जात आहे, अकोला महानगरपालिकेमध्ये जन्म दाखला तसेच मृत्यू दाखला घेण्याकरिता लोकांना पैसे द्यावे लागतात ही अत्यंत दुर्देवी बाब आहे, असे मत प्रदीप गुरुखुद्दे यांनी मांडले.



## बकाल व्यवस्थेला जबाबदार कोण

“या ‘महाचर्चा’ कार्यक्रमामुळे शहरातील समस्या किमान जनतेपर्यंत तरी पोहोचतील. महापालिका स्थापन होऊनही शहराची एकूण अवस्था बकालच आहे. एमआयडीसी अस्तित्वात असूनही उद्योगधंदे उभे राहत नाहीत. केवळ सिमेंट काँक्रीटचे रस्ते म्हणजे विकास नव्हे, अशी परखड भूमिका शरद वानखडे यांनी मांडली.”







# भाजप-राष्ट्रवादी (अजित पवार गट) युती निश्चित

**अकोला :** अकोला महानगरपालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांची युती जवळपास निश्चित झाली असून, केवळ एक ते दोन जागांवरील तिढा शिल्लक आहे. तोही लवकरच निकाली निघेल, असा ठाम विश्वास राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी व्यक्त केला. शनिवारी अकोल्यात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युतीबाबत चर्चा करण्यासाठी आपण अकोल्यात



आलो असून, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार ही चर्चा करण्यात आल्याचे नाईक यांनी सांगितले. भाजपाच्या स्थानिक नेतृत्वासोबत अतिशय सकारात्मक प्राथमिक चर्चा झाली असून, केवळ एक-दोन जागांचा प्रश्न शिल्लक आहे. तो सोडवून भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांची युती निश्चित होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाचे प्रदेश सरचिटणीस तथा आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, ज्येष्ठ नेते विजय अग्रवाल आणि महानगराध्यक्ष जयंत मसने यांच्यासोबत युतीबाबत सविस्तर चर्चा झाल्याची माहितीही नाईक यांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सुरुवातीला १५ जागांची मागणी केली होती. त्यापैकी १४ जागांवर पक्ष निवडणूक लढविणार असून, महायुतीतील उमेदवार जास्तीत जास्त संख्येने निवडून येतील, यावर आमचा भर राहील, असे राज्यमंत्री नाईक यांनी सांगितले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK